चैतन्य लहरी

भाग 1 आणि 2

# सहजयोगातील विवाह

डोलिसहिल लंडन

# विवाहाचं मूल्य

8-5-1980

सहजयोग हा पहिल्यांदा तुमची रुजुवात करण्यासाठी आहे. नंतर तो वाढतो आणि त्या वाढीमध्ये तुम्हांला एक विस्तृत वाढणारं व्यक्तिमत्व व्हावं लागतं.

विवाहामुळे तुम्ही जास्त चांगली व्यक्ति बनता किंवा, तुमचं व्यक्तिमत्व जास्त सुरेख विकसित होतं. आतां सहजयोगासांठी लग्न जरुरीचं कां आहे ? सर्वप्रथम गोष्ट म्हणजे, सर्वात मोठी, सर्वसामान्य गोष्ट म्हणजे, लग्न करणे. कांही कारणांसाठी देवाने ही विवाह करण्याची इच्छा तुम्हाला दिली आहे. पण ज्या हेतूसाठी ती दिली आहे, त्या कारणासांठी तुम्ही ती वापरली नाही तर, ते विपरीत होऊ शकतं, ती विकृती होऊ शकते. तुमच्या वाढीला अडथळा करणारी असूं शकते. त्यामुळे विवाह करण्याची स्वतःमधील ही इच्छा आपण जाणली पाहीजे.

विवाह म्हणजे तुमच्या अस्तित्वाचा अविभाज्य भाग असणारी पत्नी, जिच्यावर तुम्ही अवलंबून राहूं शकतां. ती तुमची माता असते, तुमची बहीण, तुमचं मूल, सर्वकांही ती असते. तुमच्या सर्व भावना तुमच्या पत्नीबरोबर तुम्ही वाटून घेता. त्यामुळे विवाहाची ही गरज जाणत असणारी पत्नी असणं हे महत्वाचं आहे.

आतां तुम्ही बघतां त्याप्रमाणे, सहजयोगामध्ये, तुम्हा सर्वांना डाव्या नाहीत , उजव्या बाजूचे प्रश्न आहेत. आतां जेव्हां हे विवाह होतील, बहुधा ते सहजगत्या, नैसर्गिक योजनेप्रमाणे होतील, त्यावेळी, तुमच्या व्यक्तिमत्वाला पूरक अशा व्यक्तिशी तुमचा विवाह होईल. कारण, समजा, जर, तुम्ही डावीकडील व्यक्ति असाल आणि जिची डावी बाजू जोरदार आहे अशी व्यक्ति तुम्हांला मिळाली तर, त्याची भरपाई होईल आणि तशा प्रकारे, तुमचं वैवाहीक जीवन चांगलं होईल.

पण, त्यासांठी एक गोष्ट महत्वाची आहे. ती म्हणजे, तुम्ही सहभाग घेतला पाहिजे. आयुष्यांत भागीदारी केली पाहीजे, प्रत्येक क्षणामधे, त्याच्या प्रत्येक भागामध्ये, जीवनामध्ये, सहभाग कसा घ्यायचा, हे तुम्हाला माहीत नसेल तर, ते फार कठीण होणार आहे. प्रेमाविषयी बोलायचं झालं तर, आपण प्रेम कशाप्रकारे दर्शवितो ? आपण सगळा आनंद वाटून घेऊन, आपलं सगळं दुःख, आपल्या अडचणी वाटून घेऊन, पण सहजयोगामध्ये ते थोडसं जास्त आहे. मला वाटतं, बरंच जास्त, खूप खूप जास्त आहे. इथे तुम्हाला समाज वाटून घ्यायचा असतो. सहजयोगामध्ये लग्न

व्यक्तिसाठी नसतं, मुळीच नसतं. सहजयोगामधलं लग्न हे दोन व्यक्तिमधलं आहे, असं जर कोणाला वाटत असेल तर, ती चुकीची गोष्ट आहे. ते दोन समाज असतात, ती दोन राष्ट्रही असू शकतात. ती पूर्णपणे दोन विश्वंसुध्दां असू शकतात. तेव्हां ती गोष्ट तुमच्यामध्येच आनंद उपभोगण्याची नाही.

जर, एकमेकांबरोबर पती पत्नी म्हणुन तुमचे जर चांगले संबंध असतील तर, ते सहजयोगासांठी पुरेसं नाही. समाजांतील प्रत्येक व्यक्तिला ते प्रेम उपभोगायला मिळालं पाहिजे. ते जर तुम्ही करुं शकला नाही तर, सहजयोग-विवाह तुम्ही केला नाही. लोकांचा असतो, तसा तो सर्वसाधारण विवाह आहे. त्याविषयी विशेष असं कांहीच नाही. या विवाहांमुळे महान आत्म्यांना या पृथ्वीवर येण्याची संधी मिळाली पाहिजे. जी व्यक्ति सहजयोगी आहे, जिने सहजयोगामध्ये विवाह केला आहे. सहजयोगाच्या संघांत असणा-या सहजयोगीयां बरोबर तुमचं प्रेम तुम्ही सारख्याच प्रमाणांत वाटून घेत असाल, फक्त तेव्हांच महान लोक जन्म घेतील. तर सहजयोग विवाहाची पहिली चांचणी म्हणजे, या विवाहाने इतर किती लोकांशी तुम्ही सहभाग घेऊ शकता!

आतां उदा. सर्वसाधारण विवाहात पुरुष ही व्यक्ति कुटुंबप्रमुख असते. आतां, ती व्यक्ति प्रमुख असते. पुरुष प्रमुख असतो, त्याला कांही कारणं आहेत. पुरुषाने कुटुंबप्रमुख होण्यामध्ये कांहीच अयोग्य नाही. ते ठीक आहे. तुम्ही हृदय व्हा. डोक्यापेक्षां हृदय जास्त महत्वाचं आहे. हृदय हे कसं काय महत्वाचं आहे, ते कदाचित आपल्याला कळत नसेल. असं पहा, जरी डोक्यांत बिघाड झाला तरी, हृदय चालू रहातं. पण जर हृदय बिघडलं तर, डोकंही बिघडतंच. तर, स्त्री म्हणून तुम्ही हृदय आहांत. आणि, ते कुटुंबप्रमुख आहेत. ती फक्त संवेदना आहे, एक संवेदना, जसं डोक्याला नेहमी वाटतं, ते ठरवतं आहे. पण मेंदूला माहीत आहे कीं, हृदय पुरवठा करीत आहे. सर्व गोष्टींचं खरं उगमस्थान हृदय आहे, जे सर्वव्यापी आहे. तर, स्त्रीची स्थिती किती महत्वाची आहे, याची तीला जाण असेल, तर, तिला कधीही आपला पाणउतारा झाला किंवा, आपल्यावर दबाव आणण्यांत आला, असं वाटणार नाही. ती हृदय आहे, ते तिला माहीत असेल तर. लोक मुख्यत्वे करुन स्त्रीया पाश्चात्य देशांमध्ये हा मुद्दा हरवून बसले आहेत, विसरले आहेत आणि हा त्यांना समजला नाही. हा मुद्दा जर त्यांना समजला असतां तर, कमी प्रश्न उद्भवले असते.

आतां पहा, लोकांना वाटतं, ते इतरांचं नियंत्रण करतात, त्यांच्यावर जोर लावतात, त्यांना एक प्रकारे दाबून टाकायला बघतात, तसं ते नाही. खरं तर हृदय आहे, जे सारं कांही नियंत्रित करतं. हृदयच सगळ्यांवर सत्ता गाजवतं, मेंदूला आच्छादित करण्याची, त्याला शांत करण्याची शक्ति, हृदयाकडे असते. मेंदू म्हणजे डोकेदुखी आहे. तुम्हाला ठाऊक आहे, तो नुसता काम - काम - काम - वेड्यासारखं काम करीत रहातो. पण हृदय त्याच्या प्रेमाने शरीरावर आवरण टाकतं. त्याला शांत करतं. त्याला आनंद, समाधान देतं. आत्मा हृदयामध्ये वसतो, तेव्हां हृदय ही फार महत्वाची गोष्ट आहे, जी शरीराची शक्ति आहे. जसं शेवटी, तुम्हाला आत्मा व्हावं लागतं, जो

मेंदूने तुम्ही लक्षांत घेता, आणि त्यामुळे पुरुषाला कुटुंबप्रमुख व्हावं लागतं. त्याला बाहेर जावं लागतं, काम करावं लागतं, लोकांशी व्यवहार करावा लागतो. ते तुम्ही म्हणता त्याप्रमाणं बहिर्मुख असतात.
अणि कधीकधी स्त्रीला देखील काम करावं लागतं. जर कांही अडचणी असतील, त्रास असतील, तर. पण, जर पुरुषाने म्हटलं, 'ठीक आहे, तूं काम करुं नकों', तर, आपल्यावर बळवणारी झालीय असं स्त्रीला वाटतां नये. पण तो प्रेमामुळे तसं म्हणत असेल तरच ! आतां, जर मेंदूने हृदयावर फार दबाव आणायला सुरुवात केली तर, काय होईल ? मग तिथे शुष्कता येईल. तुम्ही पहा, खूप पुरुष अतिशय काटेकोर असतात, फार अचूक वागतात, ते डोकेदुखी असतात. पूर्णपणे डोकेदुखी, स्वतःला इतरांना, सगळया समाजालाच ! असे लोक अतिशयशुष्क होऊ शकतात. आणि ते सतत असे, जसे कांही, त्यांच्या मुलांचा आनंद त्यांना उपभोगता येत नाही, कसलाही आनंद उपभोगता येत नाही. कारण, ते इतके दक्ष असतात त्या गोष्टीविषयी, जसं ते म्हणाले, 'दहा वाजून पांच मिनीटांनी या', अणि तुम्ही जर दहा वाजून नऊ मिनिटांनी किंवा अकरा मिनीटांनी पोहोचलांत, तर झालंच. ते नुसतं वेळेकडे लक्ष ठेवुन असतात. फक्त चुका काढण्यासांठी. पत्नीने आंत पाऊल ठेवलं रे ठेवलं की, ते ओरडू लागतात. 'काय, तू इतक्या उशीरा आलीस, किती ? पंचेचाळीस सेकंद गेले !' असं पहा, पत्नी येते आहे, त्याची उत्सुकता, ती भेटतिचा आनंद, तुमच्या स्वतःच्या हृदयाला तुम्ही भेटणार आहांत, किती नशिबान, तुमचं नशीब, तुम्ही चुकवितां.

आतां हा मेंदू नियमां पलिकडे जाऊ शकतो. नियम बाह्य होऊ शकतो आणि ते फार फार त्रासदायक होऊं शकतं. त्याबरोबर प्रचंड प्रश्न अडचणी येंऊ शकतात. त्यामुळे हृदयाचा मान राखला पाहिजे. हृदयाचं आज्ञापालन केलं पाहिजे. मुद्दा तो आहे. हृदयाचं ऐकलं पाहिजेच. पण त्याचा अर्थ, स्त्रीयांनी पुरुषांवर वर्चस्व गाजवावं असा नाही. तसा त्याचा अर्थ होत नाही. आज्ञापालन म्हणजे, तुमचं प्रेम काय म्हणतंय, ते तुम्ही जाणलं पाहिजे. प्रेमाने करा. प्रेमाने केले तर, ते फार चांगलं होईल.

उदा. सकाळपासुन संध्याकाळपर्यंत मी तुम्हाला व्याख्यानं देत राहिले आहे, तुम्हाला त्यांचा कंटाळा येत नाही. सामान्यतः माझ्या भाषणांचा लोकांना कंटाळा आला पाहिजे. सामान्यपणे हे काय चाललंय ? ही बाई सतत आम्हाला भाषण देते आहे. पण तुम्हाला त्याचं कांही वाटत नाही कां ? कारण तुम्हाला माहीत आहे, मी तुमच्यावर खूप प्रेम करते. तशा प्रकारे स्त्रीने आपली भूमिका प्रस्थापित केली पाहिजे कीं, ती प्रेमकरेल पुरुष थोडा विचित्र वागेल, पण, तो ताळयावर येईल. तो थोडा हाताबाहेर जाईल पण तो ताळयांवर येईल. पण बाहेरच्या दबावाच्या अनुषंगाने त्याची पारख करुं नका. जसं, बु..., 'हा रंग चांगला नाही असं त्याने म्हटलं' 'ठीक आहे, तुम्हाला जो आवडतो, तो मी वापरेन,' मग, तो म्हणेल 'अरे, मला वाटतं तूं आधी घातलेलाच चांगला होता, तुला माहीत आहे, मी खरोखर मूर्खासारखं वागलो' तसं तो म्हणेल, तुम्ही फक्त ते काय म्हणतात, त्याला संमती द्या.

माझ्या स्वतःच्या आयुष्यांत मी याचा प्रयोग केला आहे. मी केला आहे. उदा. माझ्या यजमानांना रस्त्याविषयी विशेष समजत नाही. तर समजा, आम्ही कुठे जात असलो, आणि ते म्हणाले 'मला वाटतं, आपल्याला या रस्त्याने जायला पाहिजे', तर मी म्हणते, 'ठीक आहे, तुम्ही चला पुढे आणि मी चालतेच आहे तुमच्याबरोबर' पण मी म्हटलं, 'पण, मला वाटतं हा रस्ता तो नाही, मला परत मागे चालत यावं लागेल, मला नक्कीच माहीत आहे. पण,ठीक आहे. तुम्हाला चालायचं असेल,तर, मी तुमच्या बरोबर चालूं शकते. मी चालते आहे, ठीक आहे. मला मजा येते आहे. कदाचित, मला याच रस्त्याने जायचं असेल'. मग ते विचार करुं लागतात, 'हे खरं आहे कां? हे योग्य आहे कां ?' मग ते, ते विचार करुं लागतात. हे खरंच आहे कां ? किंवा,तिला उपजत ज्ञान असल्याने. कारण असं पहा, तिला अंतर्ज्ञान असते, तिच्याकडे इतक्या गोष्टी आहेत. तुम्ही काय म्हटंल ते - अंतःप्रेरणा असते' - त्यांना अंतःप्रेरणा असते. आणि तेच आहे ते, आणि ,पत्नींची अंतःप्रेरणा बरोबर असते, हे एकदां कां त्यांना कळलं की, ते एक प्रकारे तिचं अनुकरण करुं लागतात. पण,आपल्या पतीने आपलं अनुकरण करायचं, यांत मोठं विशेष काय आहे ? ते चूकीचं आहे असं मला वाटतं. त्यांना अनुकरण करण्याची गरज नाही. 'तुम्ही या रस्त्याने चला','ते सगळं' करण्याची काय जरुर आहे ? आपण त्याच मार्गाने जात आहोत. पण एकजण डावीकडे आहे, एक उजवीकडे, हे आपल्याला समजलं पाहिजे. डाव्याला डावीकडे राहिलं पाहिजे. समजा डावीकडचं चाक उजवीकडे जाऊ लागलं, तर ? आपल्याकडे फक्त एकच चाक उरेल. मग आपण त्याविषयी काय करणार ? आपण सगळे त्याच मार्गाने जात आहोत.

त्याविषयी दोन मार्गच नाहीत. त्याला संतुलन ठेवण्यासांठी दोन चाकांची गरज आहे. पण आपण त्याच मार्गाने जात आहोत, हे लोकांना समजत नाही. त्यांना वाटतं, एका चाकाने डावीकडे गेलं पाहिजे. दुस-याने उजवीकडे. तर, तशा कुटुंबाची काय स्थिती होईल त्याची कल्पना करा. आपण त्याच मार्गाने जात आहोत. फक्त जाणून घेण्याची गरज आहे कीं, एकाला हृदयाच्या शक्तिने जगलं पाहिजे आणि दुस-याला बुध्दिप्रामाण्यवादाने. आतां, जेव्हां ते बुध्दिप्रामाण्यवादावर येतं तेव्हां, शेवटी ते हृदयामध्ये रुपांतरित होतं. कारण, ते त्या बिंदूला पोहोचतं, जिथे त्याला कांहीच कळत नाही, आणि मग, ते हृदयाप्रत येतं. एकदां कां स्त्रीयांना हे कळलं की, हे त्यांच्या स्वतःमध्ये आहे. पण, तुमच्या हृदयाच्या शक्तिचं तुम्ही पोषण केलं पाहिजे. पण, सर्व गोष्टींत तुम्ही त्यांच्याशी स्पर्धा करायला जाता. ते जर घोड्यावर बसले तर, मी कां नाही, ते जर गाडी चालवत असतील तर मी सुध्दां चालवूं शकते. टाळल्याने अनेक गोष्टी रमतगमत करतां येतात. उदा. मी गाडी चालवित नाही, त्यामुळे, प्रत्येकजण मला गाडीतून फिरवतो, मला टायपिंग येत नाही, उत्तम ! माझ्यासांठी सगळे टाईप करतात.

पण कांही गोष्टी, ज्या मी करते, त्या माझ्याइतक्या चांगल्या कोणीच करुं शकत नाही, जसं, मी फार चांगला स्वैपाक करते. त्यामुळे स्वैपाकाची गोष्ट आली कीं, त्यांना माझ्याकडे यावं लागतं, तसं आहे हे. पण

पुरुषांना ज्या गोष्टी कराव्याशा वाटतात, त्या सर्व गोष्टी तुम्ही करत नाही. किंवा स्त्रीयांना ज्या गोष्टी कराव्याशा वाटतात, त्या सर्व गोष्टी पुरुष करीत नाहीत. पुरुषांनी स्वैंपाक करणं आणि स्त्रीयांनी गाडी चालवणं, ही अयोग्य गोष्ट आहे. सर्व पौरुषत्वाच्या गोष्टी पुरुषांना माहीत हव्या आणि स्त्रीत्वाच्या सर्व स्त्रीयांना ठाऊक हव्या. त्यांनी त्या शिकून घेतल्या पाहिजेत. स्वतःचं हृदय त्यांत ओतून त्या शिकल्या पाहिजेत. मी काय म्हणते आहे : स्त्रीया तेव्हढ्याच बुध्दीवान असूं शकतात. पुरुषही त्या बरोबरीनेच बुध्दीवंत असूं शकतात. स्त्रीया उजवीकडे जाऊ शकतात, पुरुष डावीकडे त्याबद्दल कांही शंका नाही. पण त्यामुळे सर्व सृष्टीमध्ये तुम्ही असंतुलन तयार करुं शकता, तो मुद्दा आहे. तसं केल्याने कोणत्याही बाबतींत तुम्ही कमी किंवा जास्त असतां असं नाही. ही कल्पना तुमच्या मनातून पूर्णपणे निघून गेली पाहिजे कीं, पुरुषांनी विचार करावा, 'सर्व वर्चस्व गाजविणारा पुरुष मी आहे' (मी पॅंट घालणारा आहे.) ठीक आहे तुम्ही पॅण्टस् घाला आम्ही सुरेख स्कर्टस् घालतो. तशाप्रकारे त्या विषयाकडे बघीतलं पाहीजे. असं पहा, एकदां हे बाहेर पडलं कीं, सहजयोग सुरेखरित्या कार्यान्वित होईल. जेव्हां प्रेम नसतं तेव्हां, वर्चस्व जाणवतं. कधीकधी लोकांना वर्चस्व गाजवावं असं वाटतं, नाही कां ? उदा. ते म्हणतात, 'चला, चला आतां, हे खा. तुम्ही हे खाल्लं पाहिजे.' आणि, तुम्हाला ते आवडतं. कारण, तुमच्याबद्दल कोणाला तरी काळजी आहे, कळकळ आहे, प्रेम आहे. तुम्ही हे करावं, असं वाटतं, तुम्ही ते करावं, असं त्यांना वाटतं. तशी व्यक्ति तुम्हाला आवडते. कोणीतरी ते करावं, असं तुम्हाला वाटतं, 'जा, आणि वाट्टेल ते करा', असं, रस्त्यावर टाकलेलं, तुम्हाला आवडत नाही. तशी गोष्ट चांगली नव्हे, आणि 'अरे, ती व्यक्ति माझी काळजी करतेय, ती प्रेम करते आहे', ही जाणीव जेव्हां विकसित होते, त्यावेळी, त्या व्यक्तिच्या जाणीवेबद्दल तुम्ही सुध्दां लक्ष पुरवूं लागता. आतां, परत लक्षांत घ्या, परत आतां दोषीपणा कार्यान्वित होऊं लागला आहे. आतां, कोणत्याही गोष्टीबाबत दोषी वाटून घेणं, तुम्ही थांबविणार कां ? तुम्हाला दोषी वाटावं, यासांठी, या गोष्टी मी सांगत नाही. तुम्ही फार हलक्या मनस्थितीत असावं, फारच हलक्या, हे तुम्हाला कळावं, यासांठी सांगते आहे.

फार पूर्वीपासून हे संतुलन निर्माण केलं गेलं आहे. फार फार वर्षांपासून, म्हणजे, जेव्हां राधाकृष्ण अस्तित्वांत होते, त्यावेळी, राधा ही शक्ति होती आणि कृष्ण, हे, ती शक्ति व्यक्त करणारे होते. तुम्ही जसं म्हणता - 'पोटेन्शिअल' स्थितीजन्य आणि 'कायनेटिक' - गतिजन्य कार्यशक्ति. लोकांना फक्त कृष्णाविषयी माहिती आहे पण, राधाही शक्ति होती. जेव्हां त्यांना कंसाचा वध करायचा होता, त्यावेळी, त्यांनी राधेला ते करायला सांगावं लागलं, तीने सर्व कांही केलं. तिला नृत्य करावं लागलं. आणि त्यांनी तिचे पाय चेपून दिले, आणि, आतां तूं दमली असशील, असं ते म्हणाले. तिने नृत्य कां केलं ? कारण तीने नृत्य केल्याशिवाय ती गोष्ट कार्यान्वित झाली नसती. तर, ते परस्परावलंबी आहे. इतकं कीं, तुमच्याकडे फक्त चात असूं शकत नाही, किंवा, तुमच्याकडे फक्त उजेड असूं शकत नाही. या दोन गोष्टी वेगवेगळया तुमच्याकडे असूं शकत नाही. हे जर तुम्हाला समजलं तर, हे संतुलन पूर्णपणे सुसंगत होईल. जसं, देव आणि दैवी शक्ति यामध्ये आहे. पूर्णपणे ऐक्य. ते कसं काय आहे, त्याची तुम्ही

कल्पनाही करू शकत नाही. देव आणि देवीशक्ति. त्याची शक्ति, त्याची इच्छा, ही देवासमानच आहे. त्यामध्ये अजिबात कांही फरक नाही.

पण, मानवप्राण्यामध्ये तुम्ही विखुरलेले लोक आहांत. तुमची इच्छा वेगळी आहे. तुमचे विचार वेगळे आहेत. सगळं कांही इतकं लहान भागांत विभागलेलं आहे, त्यामुळेच विवाह हे पूर्णपणे विस्कळीत झालेले आहेत. 'संपूर्ण समग्रता' म्हणजे एकामेकांतली गुंफण आहे. जोपर्यंत तुमच्यामध्ये पूर्ण संतुलनाची, पूर्ण समग्रतेची जाणीव आहे, तोपर्यंत, जर पत्नीला काम करावं लागणार असेल, तर, त्यांची काळजी करायला नको. जर, पुरुषाला काम करावं लागणार असेल तर, काळजी नको. अर्थात, स्त्रीयांवर जबाबदारी आहे. स्त्री ही कुटुंबाची शोभा आहे. तीला शोभिवंत मोहक, आकर्षक असलं पाहिजे. तीने पुरुषासारखं वागणं, चांगलं दिसत नाही. कारण, पुरुष हा शेवटी पुरुष आहे. त्याने स्त्रीसारखं शोभिवंत असण्याची गरज नाही. त्याच्या वागणुकीमध्येही असुसंस्कृत (भयानक, रानटी) असण्याची गरज नाही. म्हणजे, मला असं म्हणायचं आहे, कधीं कधीं, कधी तरी, चुकून, त्याने एखादे वेळी शिवी दिली तर, पुरुषांच्या बाबतीत त्याला इतकी किंमत नाही. पण, स्त्रीच्या बाबतीत, त्याच गोष्टीला आहे. कारण, तिने शोभिवंत असायला हवं. पण अशा कांही गोष्टी आहेत, ज्या पुरुषाने कधी करु नयेत, त्या म्हणजे, स्त्रीयांच्या गोष्टींत चित्त देवून घेणे. कांही लोक इतके उत्तेजक असतात, ठाऊक आहे, भयानक, खरोखर! कशाप्रकारे, ते स्त्रियांच्या बाबतीत लक्ष घालतात, स्त्रीया कशाप्रकारे पोशाख करीत आहेत. कोणतं अत्तर वापरत आहेत, वगैरे अशा प्रकारच्या गोष्टी !

हे सगळं उंदरासारखं वागणं भयानक आहे, हे कांही पौरुषाचं लक्षण नाही. ते स्वतःला कांहीही म्हणोत, हे नाहीतर ते, पण त्याचा अर्थ ते स्त्रीयांचे इतके गुलाम झाले आहेत. मी असं ऐकलं, मिसेस केनेडींची अंतर्वस्त्रं विकायला होती आणि ऑस्ट्रेलियांहून लोक विमानाने ती विकत घ्यायला येत होते ! आतां, या पुरुषांचा विचार करा. त्यांना तुम्ही काय म्हणणार ? इंग्लीशमध्ये त्यांना काय म्हणायचं ते मला ठाऊक नाही. पण ते गांडूळांहून हीन दर्जाचे आहेत. ते कुठून येतात कोण जाणे !!

तर, पुरुषाला पुरुषासारखं असलं पाहिजे. आणि पुरुष ही रामा सारखी व्यक्ति असते. त्यांच्या जीवनाविषयी तुम्ही ऐकलं आहे. ते कसे होते, कशा प्रकारे त्यांनी त्यांच्या पत्नीवर प्रेम केलं. स्वतःच्या शीलाचा आदर राखला. जो स्वतःच्या शीलाचा आदर राखू शकत नाही तो पुरुष नव्हे. तो गांडूळच आहे, तर हे असं आहे. पुरुषाला चारित्र्य असलं पाहिजे, त्याच्यामध्ये पुरुषदाक्षीण्य पाहिजे. त्याच्यामध्ये ती संरक्षक गोष्ट हवी. जर घरांत चोर शिरला तर, तो त्याच्या पत्नीला म्हणेल की, 'अग, तूं जा आणि दार उघड, मी लपायला जातो.' आणि चोर गेल्यावर तो म्हणेल, 'मी वर्चस्व गाजविणार'. तर, तसा प्रकार नव्हे. पुरुषाने संरक्षण दिलं पाहिजे.

पुरुषानं लक्ष पुरविलं पाहिजे. त्यामुळे, कधी कधी, तो जर थोडा असुसंस्कृत असला, तर, कांही हरकत नाही. कांही हरकत नाही, कारण, त्याला तोंड द्यायचं असतं. तुम्ही म्हणू शकता, की स्त्रीया फुलं आहेत, आणि, तो काटा. आतां काटा आणि फूल यांमध्ये, तुम्हाला फूल रहावंस वाटेल, हो ना ? पण पुरुष आणि स्त्रीया यांमध्ये तुम्हाला कांटा व्हावंसं वाटेल, तर, ते चूक आहे. त्याला संरक्षण द्यायचं आहे. कौटुंबिक जीवनावर होणाऱ्या आक्रमणाला, आणि, इतर गोष्टींना त्याला तोंड द्यायचं आहे. त्याउलट, असे लोक आहेत, जे अयोग्य व्यक्तिंना कुटुंबामध्ये घुसूं देतात. ते भयानक बायका आणतात, आणि, त्यांच्या वर्चस्वामुळे, त्या, भयानक लोकांना आणतात, 'अरे, ती माझी मैत्रिण आहे, तुम्ही फक्त काय त्याला आक्षेप घेऊ शकता ?' पण, ती कशा प्रकारची मैत्रीण आहे ? त्याने म्हटलं पाहिजे, 'नाही, मलाही लोकं घरांत आलेली आवडत नाही. ती योग्य प्रकारची नाहीत. त्यांना बाहेर गेलं पाहिजे.' त्याने तसं म्हटलं पाहिजे आणि स्त्रीने ते समजुन घेतलं पाहिजे. पण, फक्त दबाव आणण्याकरितां तो तसं म्हणत असेल तर, ते निरर्थक आहे.

तर, तुम्ही स्पष्टपणे पहातां, प्रत्येक गोष्टीला दोन बाजु आहेत. जर त्या प्रेमामधून केल्या गेल्या, तर परिपूर्ण आहेत. पण दबावाने खाली केल्या गेल्या तर निरर्थक. कशाला वर्चस्व गाजवायचं ? मी म्हणते आहे, वर्चस्व हा शब्दच मला समजत नाही. जर तिथे दोन चाकं आहेत तर, ती एकमेकांवर वर्चस्व गाजवितात का ? ती तसं करु शकतात कां ? जर एकाने दबाव आणला, समजा, एक दुसऱ्याहुन मोठं झालं तर, ते गोल गोल फिरत राहील नाही कां ? यामध्ये दबाव आणण्याचा प्रश्न नाही. पण, समग्रतेचा, समजणुकीचा आणि एकमेकांशी पूर्णपणे सहभाग देण्याचा प्रश्न आहे जे कुटुंबामध्ये, समाजामध्ये झिरपलं पाहिजे.

समाजाला हितकारी नसणारी लग्नं कांही उपयोगाची नव्हेत. तो तुम्ही बघाल, नुसता टाकाऊपणा आहे. आपल्याकडे अशाप्रकारची अनेक लग्नं आहेत, लोक विवाह करतात. चांगले रहातात, एकमेकांत सौख्याने राहतात. आणि संपलं, हे, इतले विवाह, असे आहेत की, जे, त्यांचा आनंद, सौख्य यांनी समाजांत बदल घडवून आणणार आहेत. प्रत्येकाने याच असं घर करणार आहेत. त्यांच्याकडे लक्ष पुरविणार आहेत. इतरांसाठी करणार आहेत, बघा, अशी अनेक लोक आहेत ज्यांना वाटतं आपल्यामागे कोणीच कांही करत नाही. तुम्ही इतरांसाठी काय केलं आहे ? तुम्ही काय केलं आहे ? इतरांसाठी तुम्ही कांहीतरी केलं आहे कां ? एकदां, तुम्ही हे समजून घ्यायला, ठरवायला लागा. ते फार चांगलं होईल.

सर्वसामान्यतः, जर, योग्य प्रकारे वाढविण्यांत आलं नाही तर, स्त्री फार फार घमेंडी, फार स्वार्थी आत्मकेंद्रित अशी असूं शकते. पुरुषही असूं शकतात. पण स्त्रीयांबद्दल, जर, त्यांना योग्य प्रकारे वाढविण्यात आलं नाही तर, इतरांवर पैसे खर्च करायला त्यांना कदाचित आवडत नाही. इतरांनी त्यांच्या घरांत आलेलं कांही घडून

घेतलेलं, त्यांना चालत नाही. पण, परत, आपल्याला त्याची पारख केली पाहिजे. ते प्रेमाने केलं आहे की नाही ? असं, पतीने त्याचे मित्र आणले आणि त्यांना ते मित्र आलेले आवडत नसतील, कारण, त्याचा अर्थ, 'पैसं' होतो. पण, त्यांना मित्र आणण्यापेक्षा, स्वत:ला दागिने करणं त्यांना आवडेल, असं असू शकेल. कांही पुरुष तसे असतीलही. पण, दोन्ही गोष्टी चूकच आहेत. हे जाणण्यासाठी सहभाव असला पाहिजे.आणि गोष्ट सगळी अशी आहे की, तुमचं प्रेम तुम्ही इतरांना भरपूर प्रमाणांत वाटलं पाहिजे, त्यासाठी पैसे खर्च करण्याची गरज नाही. तुम्ही नुसतं त्यांच्याबाबतीत दयाळू असाल.चांगले वागा. थोडेसे पैसे खर्च करा, इतरांसाठी थोडेसे पैसे खर्च करायला हरकत नाही. आणि तुमचं थोडसं प्रेम व्यक्त करायलाही. सहजयोगात पैशांच्या बाबतीत अजूनही आपण खूप दक्ष आहोत आणि प्रेमाची गोष्ट करायची, तर, खूप खूप सावधानता बाळगून आहोत. आपल्यामध्ये इतकी भिती आहे.

आतां सहजयोगामध्ये वर्चस्व मुळीच येतां नये. उदा. मी जेव्हां तुम्हाला सांगते आहे त्यावेळी बाहेरच्या एखाद्याला वाटेल, की, मी तुमच्यावर दबाव आणते आहे. कारण, खरं तर, स्पष्टपणे पाहिल्यास, तुमच्या आंतमधल्या अत्यंत हळव्या क्लेशदायक गोष्टींना मी स्पर्श करते आहे. आतां, यापाठीमागचं प्रेम कोणी पाहिलं नाही, तर, हे वर्चस्व आहे, असं एखाद्याला वाटेल. यासर्वांमधली 'करुणा' हे त्याचं सौंदर्य आहे. त्यामुळे उत्तम मार्ग हाच की, कोणीतरी तुमच्यावर दबाव आणतं आहे, असं न समजणं.

पहा, तुमच्यावर दबाव आणणं, कोणाला शक्य आहे कां ? तुम्ही तर आत्मा आहांत. तुमचा अहंकार दुखावला जाऊ शकतो.. पण तुम्ही आत्मा आहांत ना ? तुमचा आत्मा तुम्हाला जाणवतो ना ? तुमचा आत्मा तुम्हाला जाणवत असेल, तर, तुमच्यावर कोणीही ताबा ठेवूं शकणार नाही. कोणी तुम्हाला दबावांत ठेवूं शकणार नाही. पण, आपल्यावर कोणीतरी दबाव टाकतंय, असं जर, सतत, तुम्हाला वाटत राहीलं तर, तुम्ही फार फार बेचैन व्यक्ति व्हाल. फार भयानक व्यक्ति, लोकांना तुम्ही तोंड देऊ शकणार नाही. त्यामुळे तुम्ही आत्मा आहात आणि तुमचा पती देखील आत्मा आहे, याचं आकलन होण्याची वेळ आली आहे. किंवा, तुम्ही जर पती असाल, तर तुमची पत्नी देखील आत्मा आहे, हे समजण्याची, आणि, त्या पातळीपर्यंत तुमचा आपसामधला आदर वाढला पाहिजे. कारण तुम्ही दोघेही संत आहात. तुम्ही सहजयोगी आहांत.

तुम्ही एकमेकाचा आदर केला पाहिजे, कारण, तुम्ही सहजयोगी आहांत. तुम्ही सहजयोगी असल्याने प्रत्येकजण तुमचा आदर करतो. ज्यांना आत्मसाक्षात्कार मिळाला नाही, ते तुमचा आदर करतात, 'अरे, ते साक्षात्कारी आत्मे आहेत.' विचार करा, तुम्ही आत्मसाक्षात्कार न मिळालेले असतां, आणि, तो साक्षात्कारी आत्मा आहे असं त्याने तुम्हाला सांगीतलं, तर, त्या व्यक्तिविषयी तुम्हाला कसं वाटलं असतं ? तुम्हाला त्याची जाणीव नाही. पण तुम्ही गर्विष्ट असतां नये. पण, जे साक्षात्कारी आत्मे आहेत, त्यांचा तुम्ही आदर केला पाहिजे. ती तुमच्या आईची

मुलं आहेत. एकमेकांशी बोलत असतांना, ते तुम्हाला कळलं पाहिजे, तुम्ही जेव्हां पती पत्नी असतां तेव्हां तर विशेषकरुन तुम्हाला जाणवलं पाहिजे.

पतीपत्नी विषयक अजूनपर्यंत असलेल्या तुमच्या सर्व समजुती तुम्ही सोडून दिल्या पाहिजेत. मला वाटतं, तो एक कंत्राट पध्दतीचा विवाह आहे. त्या विवाहामध्ये, तो किती वर्चस्व गाजवतो आहे, त्याच्या शक्त्या किती, माझी काय शक्ति आहे, मी किती पैसे मिळवते, त्याला किती पैसे मिळतात. पैसे कुठे ठेवले असतात, हे तुम्ही बघता. असं पहा, तुम्ही जेव्हां एकमेकांवर विश्वास ठेवत नाही, त्यावेळी फक्त तसं घडतं. पण जास्त, जास्त विश्वास टाकत जा. प्रेम करण्यांत स्पर्धा हवी. विश्वास ठेवण्यांत स्पर्धा हवी. प्रामाणिक रहाणं, दयाळूपणा, सेवाभाव यांमध्ये स्पर्धा हवी. तशा प्रकारची चढाओढ असूं दे आणि मग तुम्हाला चांगले निकाल साध्य होतील. वर्चस्व गाजवण्यापेक्षां, ताबरून रहाण्यापेक्षां, सर्व निरर्थकपणा वाटून घेण्यापेक्षां, त्याच्या उलट बाजूला चढाओढ हवी.

विवाहीत जोडप्यांबाबत घडणा-या दुस-या गोष्टी मी तुम्हाला दाखवली पाहिजे. ती पण खूप, खूपच चुकीची आहे. ते दोघेही अत्यंत दुःखी लोकांची भूमिका घेतात 'ला मिझरेबाल'. कांही झालेलं नसतांना 'हूं हूं' करत ते रडत बसतात जसं सर्व जग त्यांच्यासमोर गळून पडतं आहे. लॉर्ड बायरन सारख्या कांही महान व्यक्ति असतील किंवा कोणी भयानक लोक असतील, ज्यांनी त्या भयानक कविता लिहिल्या आहेत आणि त्या कविता ते म्हणून दाखवतील, 'सर्वांत मधुर गीते ती आहेत' आणि तशा प्रकारची अर्थहीन बडबड.

आतां सहजयोगीयांसाठी, अशा प्रकारच्या निरर्थकपणांत तुम्ही गुंतून जाऊ नकां. अशा प्रकारे बसून एकमेकांच्या दुःखांत सहभागी होण्याच्या निरर्थकतेत. आतां तुमच्याकडे कांही दुःख नाहीत. जे कांही होतं ते झालं, संपलं. आतां नव्या जाणीवेचे, नव्या गोष्टीचे, तुम्ही 'नवे' लोक आहांत. तुम्हाला कांही कष्ट नाहीत. त्यामुळे त्या सर्व गोष्टी विसरा. एकमेकांच्या सहवासाचा आंनद उपभोगण्याचा प्रयत्न करा. आणि जर, तुम्ही बसून ते कष्ट उपभोगण्याचा आनंद लुटत आलात, तर, ताबडतोब त्यामधून बाहेर या आणि म्हणा, 'त्याच लॉर्ड बायरनच्या नाटकामध्ये आपण अडकतोय' सहजयोगीयांमधून मला लॉर्ड बायरन निर्माण करायचे नाहीत.

तुम्ही आत्मा आहांत. स्वतःच्या आणि इतरांच्या आनंदाचे स्त्रोत आहांत. बसून रडणं, ओरडणं, असं कांही करण्याचा तुमचा धंदा नाही. आणि काय चाललं आहे, मला कळत नाही. तुम्हाला तुमचा आत्मा कां कळत नाही, ते मला कळत नाही. तुम्हाला तुमच्या चैतन्यलहरींची जाणीव आहे. आणि, तुम्हाला 'कळत नाही' असं तुम्ही कां म्हणतां ? तुम्हाला सगळं समजलं पाहिजे. खुष असणं, आनंदाचा सुगंध लुटणं, तो इतरांना देणं, ही फार जरुरीची क्रिया पाहिजे, तुमच्याकडे ते असलं पाहिजे. नाहीतर, सगळयाला कांही अर्थ रहाणार नाही. प्रत्येक विवाह हा

खूप दिमाखांत व्हाया, सुरेख गोष्ट व्हावी, म्हणून, मी माझ्यापरीने सगळे प्रयत्न करते. पण तेव्हां मला काय दिसतं, दोन सुरकुतलेली लोकं. दुर्मुखलेली, खाली बसलेली. जी मुलं जन्म घेणार आहेत, त्यांची कल्पना करा. ते म्हणतील काय, ही दुर्मुखले - ती लोकं अरे देवा, या रडतराऊतांपासुन आम्हाला वांचव.

तेव्हां या अशा दृष्टीकोनाने माझ्या सगळ्या आकांक्षा पुर्णपणे विखुरलेल्या स्थितीला आणू नका.

हॅम्पस्टेड

विवाह हा आनंद प्रदान करण्यासाठीं असतो. 29-11-1991.

आजचा दिवस फार शुभ आहे. मानवजातीच्या जीवनांत शुभप्रसंगीचा, तो शुभ असल्याने आनंददायक आहे. आणि त्या शुभदायी चैतन्यलहरी जगभर सर्वत्र पसरत आहेत. इंग्लंड, लंडन, स्विझर्लंड आणि इतरत्र जगभर सहजयोगी आज आनंदांत आहेत. विवाह हा आनंद देण्यासाठीच असतो. प्रफुल्लीतपणा, आनंद आणि दोन मानवी व्यक्तिमत्वाच्या एकत्रित येण्याने होणा-या अनेक शांतीदायक गोष्टींसाठी असतो, असं तुम्ही म्हणू शकतां.

आदरणीय असं, ते, अत्यंत निकटचं, आणि, वैयक्तिक नातं असतं. कोणत्याही प्रकारे त्याला अनादर करता नये किंवा असमंजसपणाने उधळून देतां नये. जीवनांमधील त्यांच्या जोडीदाराविषयीचं प्रतिबिंब डागाळण्याचा जे विचार करतात, किंवा, कोणत्याही प्रकारे प्रयत्न करतात, ते त्यांना इजा करीत असतात. एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करा. शोभा वाढविण्याचा, सुधारण्याचा नव्हे, पण, ज्याप्रमाणे, एखादा दागिना घातल्यावर त्या व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाला शोभा येते, त्या प्रमाणे, दुस-या व्यक्तिला शोभा देण्याचा प्रयत्न करा, तर .....

हे राखलं पाहिजे. विवाह, हे एक बंधन आहे, जे समाजाला, त्याच्या स्वतःच्या चिनपशीतलेल्या, सुरेख बंधनामध्ये ठेवतं. ज्यांच्यामुळे, तुमच्या वैवाहिक जीवनाचा तुम्ही विध्वंस केला आहे, त्या तथाकथित 'आधुनिक' पध्दतींना तुम्ही सोडून द्या.

तुमची स्वतःची पत्नी किंवा तुमचा स्वतःचा पती यांचा आनंद तुम्हाला उपभोगतां आला नाही, तर, या जगांत तुम्ही ज्याचा आनंद उपभोगू शकाल, असं कांहीच नाही. कारण, हे नातं सर्वांत जवळचं आणि अत्यंत पवित्र आहे. तेव्हां तुम्ही स्वतंत्र रहात होता, हे तुम्ही विसरलं पाहिजे. आतां एक व्यक्ति, एक व्यक्तिमत्व, पूर्ण सुसंगतिमध्ये एकमेकांना आधार देणा-या, एकमेकांचं पोषण करणा-या व्यक्ति म्हणून तुम्ही जगाल. ज्याविषयी तुम्ही बोलता, ती शांति त्यामुळे निर्माण होते. जर, दोन व्यक्तिंमधील विवाह यशस्वी नसतील तर, पूर्ण राष्ट्राने

आनंदांत रहाण्याची अपेक्षा आपण कशी काय करावी ? जरा विचार करा.

या पातळीवर आतां शांततेची बीजं रुजवली आहेत, त्यामुळे तुम्हाला अर्थपूर्ण व्यक्ति बनलं पाहिजे. विवाहाचा मुख्य भाग तो आहे की, त्याविषयी तुम्ही कितपत अर्थपूर्ण आहांत. मनस्वीपणाने वागणं, आक्रस्ताळेपणा करणं, क्रोधाचे झटके येणं, कोणत्या प्रकारच्या असभ्य, असमंजस पणाने वागणं सोपं आहे. पण जी अर्थपूर्ण व्यक्ति असते, ती, एक प्रकारच्या मर्यादेचं कधीही उल्लंघन करीत नाही. जर, तुम्ही एकदां ती ओलांडली की, ती परत ओलांडणं फार सोपं असतं. म्हणूनच, आज, जेव्हां आपण रामाविषयी वाचतो की, ते मर्यादा पुरुषोत्तम होते. ते एक बंधन आहे, ज्यामध्ये रहावं लागतं. स्त्रीने तिच्या मर्यादेत राहीलं पाहिजे, आणि पुरुषाने त्याच्या.

आतां स्त्रीवर पुरुष वर्चस्व गाजवतो आहे, किंवा, पुरुषावर स्त्री दबाव आणते आहे. हा विचार एक प्रकारच्या कॉम्प्लेक्स मुळे येतो. मनांत तयार झालेल्या विशिष्ट भावनांच्या गुंतागुंतीने येतो. आणि हा कॉम्प्लेक्स सोडून दिला पाहिजे. तुम्ही एकमेकांना पूरक आहांत. तुम्ही एकमेकांची शोभा वाढविता. तुमच्या पत्नी विषयी किंवा तुमच्या पतीविषयी वाईट बोलूं नका. संपूर्ण, सर्वांगसुंदर, एकमेव विवाह असण्याची ही गुरुकिल्ली आहे. एकमेकांविषयी तुम्ही इतरांशी बोलूं लागला तर, त्यामधील ती एकमेवता, तो विश्वास नष्ट होईल. त्यामुळे, तुम्हाला एकमेकांवर दृढ विश्वास ठेवला पाहिजे. आपले आईवडिल एकमेकांवर कसा विश्वास ठेवतात, हे त्यांच्याकडून शिकल्यामुळे, देवावर तसा विश्वास ठेवण्याविषयी मुलं आत्मसात करतात.

त्यामुळे, उद्याच्या महान मुलांनी जन्म घ्यावा, प्रस्थापित व्हावं आणि महान संत म्हणून वाढावं यासांठी तुम्ही धरटी आहांत.

आणि तुम्हा सर्वांना सहजयोगाची किंमत कळली पाहिजे. सर्व इंग्लिश लोकांसांठी, अमेरिकन लोकांसांठी, युरोपियन लोकांसांठी आणि भारतीयांसांठी सुध्दां तुम्हाला आदर्श विवाह निर्माण केला पाहिजे. कारण भारतीय, हे सारं तुमच्याकडून शिकतात. तुमच्याकडे आदर्श विवाह असले, तर, ते पण आदर्श विवाहांकडे वळतील. त्यामुळे इंग्लंडमध्ये रहाणा-या लोकांना या प्रसंगाची गहनता कळणं महत्वाचं आहे. यामुळे देवाची प्रशंसा पूर्ण विश्वांतून फिरेल, लोकांप्रत जाईल.

आनंद उपभोगणं, मजा लुटणं तुमचं स्वतःचं आहे. एकमेव आहे, पण सहजयोगामध्ये ते इतकं सामुहिक आहे, इतकं सामुहिक, तुम्हाला इतके भाऊबहिण आहेत, आणि पती पत्नी म्हणून एकत्रित झालेल्या तुम्हा सर्व जोडप्यांचा आनंदाची मौज, आम्ही लुटीत आहोत. विवाहामुळे तुम्हाला स्वार्थी किंवा संकुचित मनाचं, किंवा, इतरांपासून कोणत्याही प्रकारे तोडलं गेलेलं होता नये, हे तुम्हाला कळलं पाहिजे. सर्व नाती, त्यांच्या स्वतःच्या स्वरुपांत सुरेख

असतात. तुम्हाला भाऊ बहिणी आहेत, तसे आई वडिलही आहेत. तुम्हाला सहजयोग आहे, आणि, तुम्हाला मुलं आहेत. त्यांच्या स्वतःच्या कामांत त्यांची जी योग्यता आहे, त्यांना जे मिळायला हवं, ती योग्य गोष्ट केली पाहिजे, ती त्यांनी केली पाहिजे.

धार्मिक व्हायला, नीतीमान व्हायला, विवाह तुम्हाला कारण देतं. इतरांच्या शीलाचा आदर कसा करायचा आणि स्वतः कसं शीलवंत व्हायचं, ते विवाह तुम्हाला शिकवतो. आपल्याला स्वतःला शिकवलं पाहिजे. निकृष्ट विवाहांमुळे आधीच किती नुकसान झालं आहे, ते तुम्हाला माहीत आहेच. आपल्याला स्वतःला शिकवलं पाहिजे. थोडसं सहन केलं पाहिजे. आपल्याला शिकवलं पाहिजे, परत परत शिकवलं पाहिजे. स्वतःला सुधारलं पाहिजे, 'मी असा असा आहे, मी काय करुं ? असं म्हणतां नये.

विवाहप्रणालीला तुम्ही गौरव आणला पाहिजे. कारण सर्वशक्तिमान परमेश्वराने ही प्रणाली प्रस्थापित केली आहे. मानवाने नव्हे. ही चुकीची कल्पना आहे. हा शुभप्रसंग असावा, ज्यावेळी अशी शुभ गोष्ट करतां येईल यासाठी सर्वशक्तिमान परमेश्वराने ही गोष्ट प्रस्थापित केली आहे. याचं पावित्र्य अबाधित राखलं पाहिजे. आणि ते अशा प्रकारे केलं पाहिजे की, ते फार सभ्य, मर्यादशील नातं असेल.

आनंदी वैवाहिक जीवनांत सर्व संस्कृति, गौरवपूर्ण माननीय जीवनांचं सौंदर्य त्यामध्ये वहात असतं. बीभत्स, दिमाख दाखविणारं, हलकं कांही नसतं, पण गौरवपूर्ण, आनंद उपभोगणारं, प्रफुल्लीत, स्वागत करणारं, जोडीदारी - सहचरिता देणारं सर्व कांही असतं.

तुम्हा सर्वांना त्याचं महत्व कळलं असेल, याची मला खात्री आहे. आणि या प्रसंगासाठी तुम्ही सर्वांनी स्वतःला तयार केलं असेल. तुमच्या सर्वांमध्ये तुमच्या व्यक्तिमत्वाचा एक अविभाज्य भाग म्हणून तुमच्या जोडीदाराचा तुम्ही पूर्णपणे स्वीकार केलेला बघायला, तसंच किती योग्य पध्दतीने तुम्ही ते हाताळला, ते बघायला मला आवडेल. तुम्हा सर्वांना मी आशिर्वाद देते. तुम्ही सगळे संत आहांत आणि संतांचा विवाह झाला आहे. सर्व देवदूत व स्वर्गातील व्यक्ति आनंदाने गात असतील.

तुमच्या स्थितीचा, तुमच्या स्वतःच्या त्या स्थितीचा स्वीकार करा. तुमचं नातं राखण्यासाठी तुम्हाला मदत करायला आम्ही सगळे तुमच्यावरोबर आहोत. तुमचं नातं तुम्ही अबाधित राखाल, हे आम्ही सर्वांनी पाहिलं पाहिजे. विवाहाचं माधुर्य त्यांना जाणवूं द्या. आणि त्यांच्या सहचर्याची सर्व मजा आमच्याकडे वाहात येऊ द्या. जशा लहान लाटा, तरंग किना-याकडे वहात येतात आणि परत समुद्रांत मागे जातात. तशाच प्रकारची ती देवाणघेवाण असायला हवी.

त्यासाठी विवाहाचा सागर म्हणजे पावित्र्य आहे, पावित्र्य हा एकच मार्ग आहे, ज्यामुळे, तुमचं वैवाहिक जीवन तुम्ही पूर्णपणे व्यवस्थित ठेवू शकता, पूर्वी जे कांही घडलं असेल ते विसरुन जाऊ या, आतां नवं जीवन चालु होत आहे. यानंतर तुमच्या पतीपासून किंवा पत्नीपासून कांहीही लपवूं नका. सर्व कांही सांगीतलं पाहीजे. सरळ उघड जीवन, पूर्णपणे उघड, अत्यंत पवित्र आणि सर्वत्र हे पावित्र्य परिवर्तित होईल असं.

विवाह नेहमी व्यक्तिचा दर्जा उंचावतो. पण पावित्र्य ही वैवाहीक जीवनाची किल्ली आहे. आणि हे शब्द तुम्ही लक्षांत ठेवाल, अशी मी आशा करते. तुमचं मन पवित्र ठेवण्याचा प्रयत्न करा. तुमच्या पत्नीविषयी आशंका बाळगूं नका. तिला फसवूं नका. तिच्यावर विश्वास ठेवा. सरळ, उघड नातं ठेवा. कसं काय तशाप्रकारे रहायचं ते शिका, तुमच्याकडून तुमची मुलं शिकलीत आणि एकदां कां तुम्ही हा विश्वास शिकला कीं, पूर्ण जगामध्ये परिवर्तन व्हायला कांही जास्त वेळ नाही.

पूर्ण विश्वास, जो तुम्ही तुमच्यामध्ये ठेवता, तो तुम्ही दुस-यामध्ये ठेवला पाहिजे, तो दुसरा आतां कोणी दुसरा राहीला नाही. त्यामुळे, ज्यांची आधी लग्नं झाली आहेत, जे विवाहीत आहेत, जे विवाह करणार आहेत आणि ज्यांचा विवाह आज संपन्न होणार, त्या सर्वांना या आकलनाच्या अत्यंत गहन आनंदाचा मी आशिर्वाद देते. तुमच्या पावित्र्याच्या आनंदाचा आणि सौंदर्याचा प्रवाह चिरंतन तुमच्या सर्व आयुष्यांमध्ये वहात राहो.

ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो.

इतके अनेक विवाह बोर्डीमध्ये व्हावे असं आपण ठरवलं आहे ती फार चांगली आणि शुभ गोष्ट आहे. आपल्याकडे इतके विवाह होणार म्हणून मी खुप खुष आहे. ते शुभकारक आहे कारण विवाहांना देवाने आधारित, अशिर्वादीत केलेलं आहे. तुमचं विशेषेकरुन आहे कारण, या विवाहांसाठी मी इथे तुमच्यासमोर असले आहे.

पण लग्नाविषयी उगाचच जास्त गडबड गोंधळ करु नका. विवाहाविषयी उथळ वृत्ती दाखवून प्रश्न उपस्थित करुं नका. हे ब्रम्हऐकत्व्याचे विवाह आहेत जिथे सर्वव्यापी चैतन्यशक्तिच्या आत्म्याशी एकत्व साधल्याची स्वतःला जाणीव होते. हे विवाह संतामध्येच होतात, सर्वसामान्य लोकांमध्ये नव्हेत. हे जाणण्याचा प्रयत्न करा. व्यक्तिच्या अंतर्यामीच्या गुणांचा आदर करण्याचा प्रयत्न करा. जर कोणी उच्चप्रतीचा सहजयोगी असेल, तर त्याचा मान राखला पाहिजे. त्याच्याविषयी प्रेम बाळगलं पाहिजे. आणि बाहेरच्या गुणांवर नाही. बाहेरची गुणवत्ता निरर्थक असते. तुम्ही संत असल्याने एकमेकांशी विवाह करतांना तुम्ही एकमेकांचा आदर केला पाहिजे.

मी तुम्हाला सांगीतलं आहे, तुम्ही फार उच्च प्रतीचे संत आहांत. आणि तुमचं अव्यक्त सामर्थ्य इतकं

महान आहे, जे मी तुम्हाला आधीच वर्णन करुन सांगीतलं आहे, कीं, ती महती फक्त तुमच्या अंगिकार करण्यानेच तुम्हाला मिळणार आहे.

पूर्ण जग हे व्हावं म्हणून आशा करीत आहे, कीं, ज्यांचं वर्णन केलं गेलं आहे त्या लोकांनी या पृथ्वीवर यावं, पूर्ण जग तुमची प्रगति पहात आहे. ही गोष्ट व्हावी, अशी पु-या जगाची अपेक्षा आहे. पूर्ण जगाने त्याची आधीच वाच्यता केली आहे.

तुमच्या विवाहसंस्थेचा मान राखा. स्त्रीयांना गृहलक्ष्मी बनलं पाहिजे. प्रथम तिला पूर्णपणे समर्पित असलं पाहिजे. निष्ठावान असलं पाहिजे. दुसरी गोष्ट गृहलक्ष्मीसारखी तिची पूजा केली पाहिजे. त्याचा अर्थ जी पूजनीय आहे, तीची सुध्दां पूजा केली पाहिजे.

सहजयोगामध्ये तुम्हाला भूतकाळ विसरायला हवा. कारण नूतन अर्भकांसारखी दैवी प्रेमाने तुम्हाला आंघोळ घातली गेली आहे. विवाहामध्ये पती पत्नीची निष्ठा हा फार शक्तिशाली आणि सर्वांत जास्त उपभोगण्याचा गुण आहे. हृदयाचं पावित्र्य, हेच पती पत्नीची निष्ठा म्हणून व्यक्त होतं, जेव्हां नात्यांमधलं पावित्र्य तुम्हाला कळतं तेव्हां, तुम्ही त्याचा आनंद सर्वात जास्त उपभोगता. तुमची संवेदनक्षमतेचा आनंदाबरोबर गोंधळ करुं नका. तुमची पत्नी ही तुमची पत्नी आहे इथे पाश्चात्य देशांमध्ये तो सगळा एक गोंधळ झाला आहे. फार लहान मुली वयोवृध्द लोकांशी विवाह करीत आहेत आणि त्याउलटही. तो सगळा पैशांचा खेळ आहे. जेव्हां तुमच्याकडे फार जास्त असतं त्यावेळी मूर्खपणा हीच समाजाची पध्दत होते. ते इतके आंधळे होतात, कीं, त्याला ते प्रेम म्हणतात.

कदाचित कांही विवाह बरोबर नसतील, पण अपवादा ने सगळीकडे मोठा शांतताभंग, गोंधळ निर्माण करतां नये. लोकांसाठी त्यांनी ते सहन केलं पाहिजे. एकदा का गुणाचा डोलारा कोसळूं लागला, की, सहजयोगींची सारी इमारत कोसळून पडेल आणि मग इतर कोणी नाही, पण, हे मन जे साक्षी आहे, जे तुम्हाला स्पर्श करीत नाही, त्यालाच त्रास होईल. साक्षी म्हणून तुमच्या आयुष्याची शोकान्तिका बघा आणि इतरांनी अनुकरण करावे म्हणून कशा प्रकारचं प्रतिबिंब तुम्ही निर्माण करता त्याचा विचार करा. शांतताभंग झालेल्या, स्वतःचा विनाश ओढवून घेणा-या या जगामध्ये सहजयोग्याची भूमिका काय आहे ते जाणून घ्या. आणि त्या प्रकारे या नव्या भूमिकेत वर उठा.

इतरही सर्व महत्वाचे 'धर्म' आहेत. त्यांच्यावर ध्यान करा. तुमच्या चकाकणा-या धार्मिक डोळयांमध्ये माझं प्रेम परावर्तित झालेलं मला दिसतं.

नंतर डोळे - फार महत्वाची गोष्ट आहे. जिथे तुम्हाला फार काळजीपूर्वक राहीलं पाहि[illegible]. जास्त लवकर कुठेही तुमचे डोळे हलविता नये, तुमचे डोळे स्थिर ठेवा आणि बहुतेक वेळा पृथ्वीमातेवर ठेवा. तुम्ही लक्ष्मणाबद्दल ऐकलं आहे. त्यांनी सीताजींचा चेहरा कधीही पाहिला नाही. फक्त त्यांचे चरण पाहिजे. ते कसं असेल ? ते नेहमीच त्यांच्याबरोबर होते, तेव्हां कशी स्थिती असे, त्याची तुम्हाला कल्पना येईल. पूर्ण चौदा वर्ष त्यांना ब्रम्हचर्यचं जीवन व्यतित करावं लागलं. ती त्यांच्या मातेसमान होती. ती आदिशक्ति होती, हे त्यांना माहीत होतं. पण, त्यांनी फक्त तिचे चरण पाहिले.

आपली स्थिती तशी पाहिजे. आपण पावित्र्याचं वैवाहिक जीवन जगलं पाहिजे. कुटुंबाचं घरटं करा. योग्य कौटुंबिक घर, कांही बदल करण्याचा प्रयत्न करा. कांही गोष्टी घेण्याचा, कांही काटाघाटी करण्याचा प्रयत्न करा. तुमच्या पतीला समजावून देण्याचा, पत्नीला समजावून देण्याचा कुटुंबामध्ये शांती आणण्याचा प्रयत्न करा. कारण, अनेक महान आत्मे आहेत, ज्यांना जन्म घ्यायचा आहे. जे अशा प्रकारे विवाह करतात, त्या सर्वांना साक्षात्कारी मुलं झाली. त्यामुळे, तुम्ही योग्य कौटुंबिक जीवन जगण्याचा प्रयत्न करा. त्यांच्याशी दयाळूपणे वागा. कुटुंबांत चांगलं रहाण्याचा प्रयत्न करा. मुलांना बिघडवूं नका. त्यांना सुधारा प्रेमळ बनवा. चांगला समाज तयार करा. तुमच्या पैकी प्रत्येकजण तुमच्या आईच्या प्रेमाचा वाहक असला पाहिजे. जर तुम्ही सहजयोगी असाल, आणि जर तुम्ही बदलला, तुमची वागणूक बदलली तर, साहजिकच सहजयोगाला त्याची स्वतःचा नांवलौकिक मिळेल आणि प्रत्येकजण सहजयोग घेऊ लागेल.

सबीटन
21-8-83.

पृथ्वीमाता

...... पण आतां जेव्हां आपण आधुनिक सहजयोगामध्ये आहोत तेव्हां, खरंतर आपण पृथ्वीमातेच्या पातळीवर आहोत, कारण, हे अॅक्वेरियसचं युग आहे. आणि अॅक्वेरियस म्हणजे कुंभ. म्हणजेच पृथ्वीमाता तेव्हां आपण पृथ्वीमातेच्या पातळीवर आहोत. मानवप्राण्याच्या जाणीवेमध्ये देखील तुम्ही बघूं शकता. "मी म्हणते आहे, फक्त मीच नव्हे पण स्त्रीया सुध्दां आणि पुरुष देखील, जाणीव ( कॉन्शसनेस ) ही जीवनामधील स्त्रीत्वाच्या अभिव्यक्तिकडे जास्त झुकू लागली आहे.

पण, माणसं किती मूर्ख आहेत आणि स्त्रीवादी सुध्दा जास्तच मूर्ख आहेत, तर्कवाद, अर्थशास्त्र, राजकारण अशा सर्व पातळ्यांवर ते जगडत आहेत. सर्व निरुपयोगी गोष्टी आहेत या. या सर्व गोष्टींवर जर तुम्ही समानता शोधत असाल, तर तुम्ही पुरुष होता. तुम्ही पुरुषांसारखेच होता. तुम्ही जर वादविवाद करणार असाल, जर तुम्ही

युक्तिवादाने जाणार असाल, पुरुषासारखं बोलणार असाल, तर तो पौरुषाचा विकास आहे. पण मातृत्वाचा विकास, स्त्रीत्वाचा विकास म्हणजे समानता नव्हे. त्या बाबतीत पुरुष मूर्ख ठरले आहेत.

पुरुषांबरोबर त्यांच्या मूर्खपणामध्ये स्पर्धा करण्यांत कांही अर्थ नाही. आपल्यासाठी भरपूर मूर्खपणा निर्माण केला गेला आहे. त्यांच्यामध्ये असलेला निरर्थकपणा, स्पर्धा, आक्रमकता, दडपशाही आज सारं जग व्यक्त करीत आहे. त्यामुळे स्त्रीची दुसरी बाजू, जी वर्चस्व गाजवणारी, असं म्हणून ओळखली जात होती, काळी बाजू, दडपण आणलेली बाजू, वगैरे, वगैरे, त्या सर्वाला वेगळया प्रकारे स्वत:ला व्यक्त करावं लागतं. पूण त-हा, पद्धतच बदलावी लागते. आतां पहा, ख्रिश्चानिटीमध्ये आपल्याला समजूं शकेल. ख्रिश्चानिटीच कशाला, ज्यूडीझमही पहा, कोणताही धर्म, हिंदूत्व देखील. आणि सारे कांही, पण जास्त ख्रिश्चानिटीमध्ये 'आश्चर्यकारक'रित्या नरांसाठी त्यांना जागाच नव्हती. आणि फातिमाला पूर्णपणे नाहीसं करुन मुस्लीम लोकांनी त्यावरही कळस केला. आणि त्याच्याहीवर, तुम्ही बघा, ख्रिश्चन्समध्ये, ऑर्डिनेशन कां काय म्हणता तुम्ही ते, स्त्रीयांना देत नाहीत. आणि ख्रिस्त हा पुरुषापासून जन्मला नसतांना हे सगळं ! पण, त्याचा अर्थ असा नव्हे, कीं पुरुषांच्या ज्या मूर्खपणाच्या धंद्यामुळे त्यांनी या जगाला ज्या मोडकळीच्या स्थितीला आणलं आहे, त्यामध्ये तुम्ही स्पर्धा करावी.

तेव्हां, आज, आपण समजून घेतलं पाहीजे कीं, मातेच्या गुणांना विकसित करण्याची वेळ आतां आली आहे. पुरुषदेखील, जेव्हा तो माते समान होतो, तेव्हांच तो महान पुरुष होतो. ख्रिस्ताप्रमाणे त्याच्यामध्ये जेव्हां करुणा होती, तेव्हां त्याला संत म्हटलं गेलं. तेव्हां देवी म्हणून स्त्रीची गुणवत्ता नेहमी आई म्हणून असते. आणि सहजयोगांचा स्फुल्लिंग पेटविण्यासाठी ती सर्वात महत्वाची व्यक्ति आहे.

आतां ती कशा प्रकारे पेटवते, ते, मी तुम्हाला सांगते, मी तुम्हाला एक त्याच धर्तीवरचं उदाहरण देते पण ते साम्य फार टोकापर्यंत नेतां नये. समजा, एक शून्य आहे. त्याला कांही अर्थ नसतो. त्याचप्रकारे सर्वशक्तिमान परमेश्वराला कांही अर्थ नसतो. जोपर्यंत तुम्ही त्याच्यापुढे कोणतेही एक वा दोन ठेवत नाही. ते शून्य आहे. त्याला अस्तित्व आहे. पण, स्वत:ला व्यक्त करण्याची शक्ति किंवा क्षमता त्याला नाही. त्यामुळे ते शून्य आहे. त्याप्रमाणे पौरुषाची वाढ शून्य आहे असं आपण म्हटलं पाहिजे.

तुम्हाला समजण्यासांठी मी तुम्हाला दुसरी साम्य असलेली गोष्ट सांगते. तुम्ही जर तुमच्या डोक्यावरुन जाणा-या फार जास्त विद्युतदाबाच्या तारा पाहिल्या तर, त्या पूर्णपणे निरुपद्रवी असतात. त्यांत कांही त्रास नसतो. दिल्ली मध्ये एक सूचना आली होती कीं, एक मोठा भूखंड उपलब्ध आहे, त्याच्यावरुन हाय पॉवरच्या वायर्स जात आहेत. आणि आपल्याला तो विनामूल्य मिळूं शकतो. मी विचारलं, 'मग अडचण काय आहे ?' ते म्हणाले, 'फक्त जेव्हां त्याच्या बरोबर जमीनीशी सांगड घातली गेली कीं, मग अडचण येईल.' तर मग जो पर्यंत ही, जी काय हाय-

पॉवरची गोष्ट आहे - काय असेल ती - ती जोवर जमिनीला जोडली गेली नसते तो पर्यंत तिच्यामध्ये कांही अर्थ नसतो.

पण, या तारा, ज्या शून्य आहेत, त्यांच्यामधून प्रवाहित होणा-या या प्रभावी शक्तिपेक्षां पृथ्वी, भूमाता ही फारच वेगळी आहे. त्याचप्रकारे, स्त्रीमध्ये, स्त्रीचं गर्भाशय ही कुंडलिनी आहे. आतां गर्भाशय म्हणजे काय ? जर ती कुंडलिनी असेल, स्थूलामध्ये ती कुंडलिनी व्यक्त करीत असेल तर, त्याचा अर्थ पृथ्वीमातादेखील, गर्भाशयासारखीच आहे. आतां, गर्भाशय काय करतं ? ते शुक्राचा स्वीकार करतं. ती फक्त पुरुषाची एक छिचोर क्रिया आहे. किंवा तुम्ही म्हणू शकता, आक्रमकता आहे. आणि त्यानंतर ती त्याचं पोषण करते त्याच्याकडे लक्ष पुरविते, त्याला सुधारते, वाढू देते, आक्रमक मार्गाने नव्हे तर, अतिशय करुणामय, अर्थपूर्णरितीने. जो पर्यंत त्याची पूर्णवाढ होऊन ते गर्भाशयाबाहेर फेकलं जात नाही तोवर. तेव्हां गर्भाशयाची कल्पना ही अशी आहे कीं, ते अशा स्वरुपांत व्यक्त झालं पाहिजे कीं, ते कुठेही दबाव आणणार नाही. गर्भावर कुठेही दाब येणार नाही. जर त्याने जोर आणला तर तो कसा काय वाढेल ? म्हणून ते त्याचं पोषण करतं, त्याला तयार करतं.

आजचा सहजयोग हा असा आहे. आतां, पृथ्वीमाता जी तुमच्या मुलाधाराच्या प्रतिकात्मक रुपाने तुमच्यामध्ये आहे. ती आदिशक्तिचं प्रतिक आहे. ती इथे, तुमचं पोषण करायला, तुमची नव्या, परिपक्व व्यक्तिमत्वामध्ये वाढ व्हायला, तुमच्यासमोर बसली आहे. ही कल्पना आपण समजून घेतली पाहिजे.

पाश्चात्य देशांतील स्त्रीयांना कळलं पाहीजे कीं, पुरुषांकडून त्यांनी घेतलेल्या निरर्थक कल्पना पूर्णपणे फेकून दिल्या पाहीजेत. त्यांना स्त्रीया बनलं पाहिजे. ज्या स्त्रीया पुरुषांसारखे बोलत आहेत त्या सहजयोगाला कधीच मदत करणार नाहीत. या पृथ्वीमातेसारखे, तुम्हाला ती जे हवं ते करु देते, त्या या पृथ्वीमातेसारखं त्यांना झालं पाहिजे. मी म्हणते आहे, तिचा अयोग्य रितीने पुरेपूर फायदा घेण्याइतके तुम्ही मानव प्राणी मूर्ख झाला आहांत. इतकंच नव्हे तर, अनेक प्रकारचा निरर्थकपणा ती सहन करते आहे. पण मग ती वेळ येते जेव्हां, ती स्फोटक होते आणि स्वतःमध्ये लोकांना खाऊन टाकायला सुरुवात करते. मग तुम्ही धरतीकंप पाहाता, दुष्काळ, हे आणि ते, सर्व प्रकारच्या गोष्टी येऊ लागतात. आणि लोक या अडचणींमध्ये सांपडतात, ज्यांच्यासांठी ते पृथ्वीमातेला दोष देतात. स्वतःच्या आक्रमक स्वभावामुळे मानवप्राण्याने निर्माण केलेल्या प्रश्नांवरचा, पृथ्वीमातेवर देखील केलेल्या आक्रमकतेमुळे उद्भवलेल्या प्रश्नांसाठी, त्यावरचा नफा सुध्दा, त्यांना चुकविला पाहिजे आणि तो ते चुकवित आहेत.

आतां, सर्व प्रकारच्या दंगली घडवून आणणारी अशा, प्रकारची आक्रमक चळवळ थांबविण्यासांठी व्यक्तिला

मागे परतलं पाहिजे. आणि करुणेची, पूर्णत्वाची संवेदना विकसित केली पाहिजे. जोपर्यंत तुम्ही पूर्णत्वाला, अखंडत्व, संपूर्ण, समग्र, जे तुमचं गर्भाशय आहे, जी तुमची आई, आहे, मानून घेत नाही. वैयक्तिक रहाण्याचा जोपर्यंत तुम्ही प्रयत्न कराल, तोपर्यंत तुम्ही चांगले सहजयोगी होऊ शकत नाही. पूर्णत्वाशी, अखंडत्वाशी तुम्ही ऐक्य साधलं पाहिजे.

तुमचा स्वतःचा खाजगीपणा सांभाळण्याचा तुम्ही प्रयत्न केलांत, तर इतरांना त्यांच्या खाजगीपणापासून तुम्ही वंचित करता. तुम्ही सहजयोगी नसतांना तुमचा खाजगीपणा राखणं ठीक होतं. कारण, त्यावेळी तुमच्या वैयक्तिकतेमध्ये तुम्हाला वाढायचं होतं. पण सहजयोगानंतर तुम्हाला इतर सर्वांबरोबर एक व्हावं लागतं, तें फार महत्त्वाचं आहे. सहजयोगाआधी तुम्ही वेगळे असतां. सहजयोगानंतर पूर्ण संकल्पना बदलली पाहिजे. आतां तुम्ही पूर्णत्वाशी ऐक्य साधलं आहे. आणि पूर्णत्वाशी ऐक्य साधल्याची जाणीव आहे. तेव्हां तुमचे सर्व वैयक्तिक दृष्टीकोन सोडून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

...... जीला गर्भधारणा करायची आहे. बालकाला जन्म द्यायचा आहे, त्याचं पालन पोषण करायचं आहे, त्याच्या गरजा भागवायच्या आहेत, संरक्षण करायचं आहे, शिकवणूक द्यायची आहे त्या आईचा विचार करा.

...... सहजयोग्याला कळलं पाहिजे कीं, त्याच प्रकारे त्याच्यामध्ये मूल, आत्मा, जन्माला येत आहे. आत्मा हे बालक आहे, जे त्याच्यामध्ये जन्माला येणार आहे. आतां कुंडलिनीनं त्याला त्याचं पोषण करायचं आहे. त्याला त्याने पाणी दिलं पाहिजे. त्याची काळजी घेतली पाहिजे. त्याच्या वाढीला वाव दिला पाहिजे. आतां निरर्थक गोष्टींसांठी वेळ कुठे आहे ? तुमच्या हातांत मूल आहे. तुम्ही सर्व मूलाची म्हणजे तुमच्या आत्म्याची काळजी घेणा-या आया आहांत. तर, या सगळया गोष्टींकडे लक्ष द्यायला तुम्हाला वेळ कुठे आहे ? या बाळाला आनंदी ठेवायला मी काय करुं शकतो ? त्या बाळाला वाढवायला, माझा आत्मा म्हणून याला पूर्णपणे व्यक्त करायला मी काय करुं शकतो ? इकडे लक्ष पाहिजे. मूल परिपक्व झालं कीं आई स्वतःची जागा बदलते, त्यामुळे आतां मातृत्वाने पितृत्वाची जागा घेतली पाहिजे. तुमच्या स्वतःविषयी मातृत्व वाटलं पाहिजे. आईचा मुलाविषयी असतो तसा दृष्टीकोन हवा. तिचं चित्त मुलांकडे असतं तसं.

पण सहजयोगामध्ये जर मातृत्व वैश्विक आहे, कारण, तुम्ही जर नाक असाल तर, कोणीतरी डोळा असेल, तुम्ही कान असाल, तर कोणीतरी ओठ असेल, त्यामुळे एखादा कोणी सहजयोगी अडचणीमध्ये असेल, तर, तुम्ही अडचणींत आहांत हे तुम्हाला कळलं पाहिजे. तुमच्या वाढीला धोका, याचा अर्थ पूर्णत्व हेच वाढत असल्याने तुमच्या वाढीला धोका आहे.

..... तेव्हां दोन्ही बाजूनी, पुरुषांच्या आणि स्त्रीयांच्या, हे जाणलं पाहिजे कीं, तुम्ही पुरुष असाल, आणि जर वर्चस्व गाजवणारे पुरुष असाल, तर ठीक आहे. पण, जर तुम्ही स्त्री असाल आणि वर्चस्व गाजवीत असाल तर, सहजयोगाने तुम्हाला व्यवस्थित करणं कठीण आहे. कारण, स्त्री असण्याची तुमची गुणवत्ता तुम्ही घालविली आहे. सुरुवातीला तुम्ही कमीतकमी स्त्री असलं पाहिजे. तुम्ही जर स्त्रीदेखील नसाल तर, ही तिसरी व्यक्ति जी स्त्री ही नाही नी पुरुष ही नाही तिचं तुम्ही काय करणार ?

आतां, पुरुष ते जेव्हां वर्चस्व गाजवितात तेव्हां, त्यांनी करुणामय असलं पाहिजे हे त्यांना कळायला हवं. त्यांना दयाळू असलं पाहिजे. समजूतदार असलं पाहिजे. पण दुस-याला पूर्ण समाधान देण्याची अतिशय उत्कट इच्छा असणारे नको. हे आपल्याला कळलं पाहिजे की तुम्ही दुस-याला पूर्णपणे खुश ठेवण्यासाठी फार कांही करणारे नको. आतां स्त्रीया, त्यांना कसं असलं पाहिजे, महान, विशाल, ग्रहणक्षम, सर्व स्वीकार करणा-या, पोषण करणा-या वगैरे वगैरे.

पाश्चात्य देशांमध्ये कधी कधी नव-यांना ज्या प्रकारे सांगीतलं जातं, मला तर शॉकच बसला, श्री. एक्स ना पत्नी सांगते, 'एक्स, तूं हे केलं नाहीस, एक्स, तू ते केलं नाहीस, तू हे कसं केलं आहेस, हे कर, ते कर, ते कर, स्त्रीची ते करण्याची इच्छा नसते. त्याला कांहीतरी करायला सांगणं, त्याला ते करायला सांगणं हे अगदी अयोग्य आहे. तुम्ही पुरुष बनत आहांत आणि मग पोषण करण्याची स्त्रीच्या प्रेमाची ती शक्ति अ— पूर्णपणे घालवून बसतो. ती स्त्रीची शक्ति आहे, हे स्त्रीयांना कळत नाही.

माझ्या स्वतःच्या नातीचं उदाहरण मी तुम्हाला सांगते. सतत तिला एअर होस्टेस व्हायचं असतं. ती म्हणते, 'तूं एअर होस्टेस होण्याबद्दल विचार केला असशील' मी म्हटलं, 'कां ? एअर होस्टेस बनण्यांत इतकं विशेष काय आहे ?' ती म्हणते 'फक्त त्याच वेळी तुम्ही एखाद्याला अन्न देऊ शकता.'

पहिलं तुम्ही, आईची नैसर्गिक प्रकृती कीं 'मला त्यांना जेवताना पाहूं दे' त्या स्वतः खात नाहीत इतरांनी खावं असं त्यांना वाटतं. पण ही पाश्चात्य स्त्रींची संकल्पना नाही. त्यांना हे कळत नाही, 'कां ? मी हे केलं आहे, तर तो हे कां करत नाही ?' या गोष्टी योग्य रितीने योग्य प्रकारे करणं, हा तुमचा विशेष हक्क आहे. पण समजा, कोणी चांगला तंत्रज्ञ असला तर, 'मी तंत्रज्ञाच्या गोष्टी करते' ती तिथे तंत्रज्ञाच्या गोष्टी करण्यासांठी नाही. भावनांच्या तंत्रासांठी ती आहे.

त्याउलट, अगदी विरोधी प्रकारात - जसं पुरुष घरी आला की, हुकूम सोडत जातो, 'तुला ते नीट ठेवायला हवं होतं, माझा गालिचा तूं कां खराब केलास ? तूं हे कां केलंस ? ते स्वच्छ कर, हे कर, ते कर.'

त्याच्या भावनांची सर्व तंत्र संपुष्टात आली असतात. एकदा कां त्याची भावनांची तंत्र संपली की, तो निरर्थक आहे आणि नाहीतरी तुम्ही निरर्थक आहातच आणि पुरुषांनीही बायकांचं काम करतां नये. त्यांना त्यांची स्वतःची कामं करुं दे.

मला वाटतं, पाश्चात्य देशांत हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. पुरुष हे पुरुष नाहीत आणि स्त्रीया स्त्रीया नाहीत. ही गुणवत्ता मला इतकी भयानक वाटते कीं, या मिश्रणाला कसं काय हाताळायचं ते मला कळत नाही. तुम्ही जर हायब्रीड पदार्थ असाल, तर सहजयोग्याची गुणवत्ता तुमच्यामध्ये असूं शकत नाही ही जीवनांतील साधी गोष्ट तुम्हाला समजली पाहिजे. तुम्ही जर हे सगळं मिक्स केलं, तर फार विचित्र गोष्ट होईल नाही कां ? त्यामुळे स्त्रीने स्त्रीसारखं आणि पुरुषाने पुरुषासारखं होण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आतां चेतनेच्या विकासावर होणारा पौरुषत्वाचा प्रभाव, या दृष्टीने पुरुषाची परिस्थिती काय आहे ते पहा. जर पौरुषत्व व्यक्त होत गेलं, तसं शास्त्र सायन्स विकसित होत गेलं. हे सगळं ज्ञान, या गोष्टी ज्या बाहेर आहेत त्या सर्वांचा आपण विकास केला आतां सगळं कांही तयार आहे. आतां स्त्रीयांनी वर आलं पाहिजे. म्हणजे ती फार संदिग्धतेने म्हणते आहे. स्त्रीयांचा विचार नका करुं पण स्त्रीत्वाचा. स्त्रीत्वाच्या स्वभावाने उचल घेतली पाहिजे. आतां सगळं तयार आहे, फक्त ते कार्यान्वित झालं पाहिजे. सर्व चक्र तयार आहेत, आतां कुंडलिनीचं जागरण करा. आतां कुंडलिनीचं वागणं आणि वागण्याची पध्दत चक्रांच्या कार्यपध्दतीपेक्षां फारच वेगळी आहे. जर कुंडलिनी चक्र आहे, आणि चक्रं कुंडलिनी झाली तर तुम्ही सहजयोग कसा सांभाळाल ?

पण पूर्ण माननीयतेने आणि हक्काने आपला स्वभाव आपण धारण केला पाहिजे. कोणत्याही प्रकारे आपल्याला कमीपणा जाणवून घेतां नये. पुरुष घोड्यावर बसला की, स्त्रीला घोड्यावर बसावंसं वाटतं. स्त्रीला घोड्यावर बसण्याची गरज काय आहे ? मला कळत नाही. इथे सगळ्या बायका घोड्यावर बसत आहेत. त्या सगळ्या घोड्यांसारख्या होणार. पुरुषांनी त्या गोष्टी आधीच केल्या आहेत. त्या सगळ्या स्त्रीयांनी करण्याची मुळीच गरज नाही.

उदाहरणार्थ, पुरुषी व्यक्तिमत्वाचं एक व्यक्तित्व असतं. त्याला येऊन विशिष्ट कार्य करायचं असतं. आतां तुम्ही ते केलं आहे. आतां दुस-या व्यक्तिमत्वाला हे काम करुं दे. आतां देवाची परिस्थिती पण बघा. एक प्रकारची गोष्ट केली गेली की, सगळी गुंतागुंत होते अशा प्रकारे की, दुसरी गोष्ट जी पुढे येते, तिला तेच करण्याची इच्छा होते. आला कां लक्षांत माझा मुद्दा ?

सगळी शक्ति पूर्णपणे व्यर्थ जाते. या कुंभ युगामध्ये, ॲक्वेरिअसच्या युगात, कुंडलीनी उत्थान पावून, डावी उजवी बाजू एकत्र येऊन, तुम्ही सर्वांनी प्रकाशित व्हावं, अशी सर्व तयारी केली गेली आहे. प्रश्न फक्त आपल्या अस्तित्वाने योग्य समज घेऊन सर्व कामाचा वाटा उचलण्याचा होता.

पृथ्वीमाताच कशी निर्माण केली गेली पहा. ती पण फार साधी गोष्ट आहे. पहिल्यांदा शक्तिची हालचाल सुरु झाली. आतां ही एकत्रित शक्ति आहे, ठीक आहे ? ही एकत्रित शक्ति अशी गोल गोल फिरत राहीली. आणि जेव्हा ती घट्ट झाली, तेव्हां हा मोठा आघात झाला. जेव्हां हा मोठा आघात बिग बॅन्ग झाला, ते एक प्रकारे पुरुषी कार्य आहे. पुरुषी पध्दतीनं, कारण, अजून पृथ्वी तयार झालेली नाही. तेव्हां हे छोटे छोटे तुकडे परत गोल गोल फिरुं लागले. आणि त्या गतीने ते गोलाकार झाले. त्यांच्यापैकी एका कामासाठी पृथ्वीमातेला निवडण्यांत आलं.

पृथ्वीमातेमध्ये पाण्यामधून जीवन आलं. कार्बन आंत आला, तिथे प्रत्येकाने मदत केली व मानवाची निर्मिती झाली. आणि त्याच्या समाजाची उन्नती करायला माणूस भटकूं लागला आणि त्याला त्यांनी जे कांही केलं आहे, त्यांच्या अहंकाराने जे करणं शक्य होतं ते आतां संपलं आहे. त्यांचं काम त्यांनी केलं आहे. आतां तो सरकारी अनुदानावर आहे.

आतां स्त्रीया किंवा कुंडलिनी आपण म्हणूं शकतो. इतकी वर्षं ती वाट पहात होती. विश्रांती घेत होती. ती घटका येण्याची वाट पहात होती, तर, 'बहराची वेळ आली आहे' असं आपण आतां म्हणतो, त्यावेळी कुंडलिनीला उत्थान पावलं पाहिजे आणि पेट घेतला पाहिजे, अशा प्रकारे की, सर्व काम पूर्ण होईल ते सार्थ आहे, कळलं कां तुम्हाला आतां ?

पुरुष आणि स्त्रिया यांमध्ये स्पर्धा नाही पण कार्यपध्दती वेगळी आहे. तुम्हाला हे जर कळलं तरच या प्रकारची क्रांती घडून येईल. आणि बंड घडून येणार नाही. खरं म्हणजे स्त्रीयांनी पुरुषांविरुध्द बंड पुकारलं आहे. आणि ते निरर्थक आहे. इतकी डोकेदुखी आहे ! तुम्ही कांहीतरी निर्माण करतां त्याला वाढू देतां आणि नंतर जीला पूर्ण करायचं आहे ती दूसरी पार्टी येऊन बंड करु लागते.

क्रांती झाली पाहिजे आणि ती तेव्हांच शक्य आहे जेव्हां, काय करायचं आतां बाकी राहीलं आहे हे आपल्याला कळेल तेव्हां, समजलं कां मी काय म्हणते, ते ?

तो भाग म्हणजे आत्मसाक्षात्कार, आपल्या कुंडलिनीचं जागरण, त्यासाठी तुमच्या स्त्रीत्वाचे गुण तुम्हाला

मदत करणार आहेत. पुरुषी नाही. तेव्हां पुरुषांनी आक्रमकता सोडून दिली पाहिजे आणि ते सहजयोगी असल्याने त्यांनी स्त्रीत्वाचे गुण उचलले पाहिजेत. भांडण करणे नव्हे. जर भांडत असतील तर, त्या स्त्रीया नव्हेत. असं पहा, स्त्रीयांना सांगितलं गेलं, तुम्ही कुचकामी आहात त्यामुळे आतां त्या दाखवू पहातात, 'नाहीनाही, आम्ही पण ठीक आहोत. तुम्ही एक कावळा खाल्ला तर आम्ही तीन खाऊ.' आतां समयोचित सूज्ञतेची भाषाच अशी असेल की, आमच्या जीवनाची पध्दत व रीत बदलण्यासाठी आम्हांला काय केलं पाहिजे ?' इथे काय अयोग्य आहे ?

वळणाचा बिंदु आला आहे, आतां क्रांती' हे कोणत्याही प्रकारे बंड नाही, लोकांची ती चुकीची कल्पना आहे. ते बंड नव्हे की, तूं मला मार, मी तुला मारतो. एकमेकांना मारत रहायचं, लंबका सारखं फिरत रहायचं, लंबकाची दोलायमान हालचाल तुम्ही पाहिली आहे. ही गोष्ट अशी नाही की आज तुम्ही मुस्लिम म्हणून जन्मला उद्या ज्यु, परत परत तुम्ही - तो लंबक नव्हे. ती स्पायरल हालचाल आहे चक्राकार जिन्यासारखी. दरवेळी एक क्रांती साध्य केल्यावर तुम्ही पुर्वीपेक्षा वरच्या उच्च स्थितीला पोहोचता तर ही स्पायरल हालचाल आहे कळलं का?

आतां आपल्या सर्व अस्तित्वामध्ये उच्च स्थिती गाठण्यासाठी आपण काय केलं पाहिजे ? या बिंदुपासून त्या बिंदूप्रत आपण वर आलं पाहिजे, हे कळायला हवं, ते लंबकासारखं नव्हे, तर स्पायरल पध्दतीने.

आणि हालचाल स्पायरल सारखी व्हावी, यासाठी दुस-या प्रकारचा जोर वापरला पाहिजे. आतांपर्यंत तुम्ही जे कांही वापरलं, त्याला दुस-या प्रकारची शक्ति दिली पाहिजे ती म्हणजे स्त्रीयांची स्त्रीत्वाची गुणवत्ता. पण स्त्रीत्व असणा-या स्त्रीया कुठे आहेत ? त्या स्त्रीयांसारखा पोशाख करतात, स्त्री होण्याचा प्रयत्न करतात, पण ते तशा प्रकारचं नाही. आंत मधून हृदयांतुन स्त्रीहृदय. जे ख्रिस्ताने त्याच्या जीवनामध्ये दाखविलं त्याने क्षमा केली. फक्त स्त्रीच क्षमा करु शकते. पुरुष नाही कारण, पुरुष आक्रमक असतो. तो कसा काय क्षमा करेल ? कृष्णाने कोणाला क्षमा केली नाही. तो ठार करत असे. राजरोसपणे 'ठीक आहे, तर तुम्ही असे काय, ठीक आहे' झालं ।

ख्रिस्तांनी इतक्या सीमेपर्यंत जाऊन क्षमा केली, हे दाखवायला की, त्या स्पायरलला आतां ते तळाशीत आहेत आणि मानवप्राण्यामध्ये आतां स्त्रीत्वाचे गुण विकसित झाले पाहिजेत. पण त्याचा अर्थ असा नव्हे की, तुम्ही स्त्रीसारखं चालायला लागावं, किंवा केंस वाढवु लागावं. कारण तो दुसरा मूर्खपणा आहे. पण मातेसारखं झालं पाहिजे, पित्यासारखं नव्हे. तो दयाळूपणा, उदारपणा तुमच्या एकमेकांबरोबरच्या वागणुकीमध्ये प्रतीत झाला पाहिजे.

ही शक्ति सुधारते आणि कधी कधी अर्थातच रागवतेदेखील. आईला कधी कधी रागवावं लागतं. विशेषतः जी लोकं त्यांच्या वागणुकीत योग्य ती सुधारणा करत नाहीत, तेव्हा ओरडणं, शिक्षा देणं आणि कधी कधी ती नाशही करते. ते योग्य आहे. पण ते कधीतरी, सतत नव्हे. तर पृथ्वीमातेसारखं होण्यासाठी स्त्रीनी सहनशील बनलं पाहिजे, याचा आपण स्वीकार केला पाहिजे, 'धरा' ती सर्व गोष्टींना आधार देते, भरणपोषण करते. सर्व कांही ती घेते. व्हायब्रेशन्सच शोषण करते.

आणि आता आत्मसाक्षात्कारानंतर पहिल्यांदा, तिच्याकडून मिळालेलं ते तुम्ही तिला पहिल्यांदा देत आहात. तिने निर्माण केलेल्या झाडांना तुम्ही व्हायब्रेशन्स देऊ शकता. सुरेख करूं शकता. फूल तुम्ही जास्त सुरेख फूल करूं शकता. आतां तुमच्यामध्ये तुमची पृथ्वीमाता जागृत झाल्याने, तिच्याकडून तुम्हाला जे कांही मिळालं आहे, ते तुम्ही तिला परत देऊ शकतां. आणि ते इतरांना देऊ शकतां. 'औदार्य, हृदयाची महानता, उमदेपणा, क्षमा, प्रेम, आपुलकी, प्रेमासाठी सर्व कांही सहन करणं, आणि आईवर, मुलांसाठी ती उपास तापास करेल, कांहीही करेल, तिच्या मुलांचं रक्षण करायला कांही करेल. तिच्या मुलांसाठी तिच्याकडे पूर्ण समर्पण आहे. ती खरी आहे. मी म्हणते, आजकाल कशा प्रकारच्या माता दिसतात, ना त्या धड माता असतात, ना स्त्रीया. मी म्हणतेय मातेचं खरं प्रतिबिंब ते आहे, आणि तुमच्यासमोर 'प्रतिबिंब' आहे.

तुम्ही पुरुष असा, वा स्त्री, हे आतां प्रत्येक व्यक्तिने विकसीत केलं पाहिजे. सहजयोगी म्हणून आपुलकी, प्रेम, करुणा यांची नवी मार्यादा तुम्ही विकसित केली पाहिजे. रागवणं, क्रुद्ध मनःस्थितीत वावरणं, लोकांवर ओरडणं, यामुळे तुम्हाला कांही लाभ होणार नाही. तुम्हाला जर पूर्णत्वाला मदत करायची असेल, पूर्णत्वाच्या बाजूला मदत करायची असेल तर स्वतःला थोडं हळुवार व्यक्ति बनविण्याचा प्रयत्न करा. तुमची मनःस्थिती तुम्ही वाईट करून घेता, इतरांबाबत दयाळू नसतां याबद्दल स्वतःवर रागविण्याचा प्रयत्न करा. पौरुषत्वाची जास्त वाढ झाल्याने सर्व प्रश्न उद्भवले आहेत. यामधून जास्त वाढ, एका विशिष्ट बिंदूपर्यंत ती जाते, ती आतां अशा विकृत बिंदूपर्यंत पोहोचली आहे जिथून तिला खाली आलं पाहिजे.

आत्मसाक्षात्काराविना स्त्रीत्व देखील खालच्या पातळीवरचं, क्षुद्र, अतिशय लहान हृदयाचं ज्याला आपण चिकन हार्टेड म्हणू शकू असतं. स्वतःच्या मुलांबद्दलच सतत काळजीत असणं, तिथे प्रत्येकाला बदललं पाहिजे. प्रत्येक सहजयोगीविषयी प्रेम, आपुलकी हवी. प्रत्येक व्यक्तिविषयी, ज्यावेळी इतरांशी झगडण्याची वेळ येते तेव्हा, तुम्ही सगळे एक असतां पण तुमच्यामध्ये तुम्ही एकमेकांकडे लक्ष देऊ शकतां. उदा. त्यांना सांगा माझ्या नाकाला इथे दुखतं आहे. त्याच प्रकारे मी ते चोळण्याचा प्रयत्न करीन, कापणार नाही. नाही कां ? कां माझं नाक आपटेन

तर दुसरी व्यक्ति म्हणजे मीच आहे ही जाणीव दबळू, हळूवार रहा. त्याप्रकारे मदत, सुधारणा करण्याचा प्रयत्न करा. सगळं कांही तुम्हाला समजलं असेल अशी मी आशा करते.

विंचेस्टर

सजेसं होण्याची तयारी 17-5-1980.

तुमचा दृष्टीकोन, आपसांमधली जाणीव, आपसांतलं प्रेम वाढविणारा हवा. अदभुतरम्य, काल्पनिक वाढविणारा नको. पण सर्वांत वाईट म्हणजे उजवीकडची शुष्क संवेदना. तुमचा घसा सुकला तर, तुम्ही बोलूही शकत नाही. अचानक तुम्हाला आढळतं - संपलं । तुम्हाला बोलांच येत नाही. कारण, तुम्ही सुकलेले असता. आणि दुसरी बाजू ती आहे, जिथे आपल्या पती पत्नीशी कांही लोक मानसिक कल्पना योजतात. असं ते बोलणार नाहीत, ही तुम्हाला मी जीवनाची नुसती मानसिक बाजु सांगते आहे. 'मी तिच्याशी बोलणार नाही, शब्द काढणार नाही' अशा प्रकारे. ते वागतील. शुष्कता. ती देखील आनंदाला मारक ठरते. एकजण, ते जास्त प्रमाणांत करत असतो, दुसरा ते करत नसतो. असं पहा, तुम्ही एक टनभर साखर घेता किंवा साखर घेतच नाही. चहाचा सर्वांत जास्त आनंद उपभोगता यावा, यासाठी तुम्ही एक चमचाभर साखर वापरतल. ना जास्त, ना कमी. त्याचप्रकारे जीवनांतही, कशाचंही तुम्ही फार जास्त कांही घेतां नये, किंवा, दुस-या एखाद्या गोष्टीचं फार कमी घेतां नये.

आतां, ज्याचा नुकताच विवाह झालां आहे त्या व्यक्तिला विशेष करुन भारतीय स्त्रीला, पती म्हणजे सर्वांत शेवटचा, सगळं आलं! बाकी सगळं शून्य. मग तशा स्त्रीया निरर्थक असतात. किंवा, इथे मी पुरुष पाहिले आहेत ते त्यांच्या पत्नी विषयी वेडे झालेले असतात. त्यांच्यासाठी सुध्दा, बाकीचं सारं जीवन निरर्थक असतं. तेव्हा या सर्व गोष्टी विषयी संतुलित दृष्टीकोन ठेवा. तुमच्यामध्ये, तुमच्या पत्नीवर प्रेम करणारी व्यक्ति आहे. तुमची पत्नी, जी देखील तुमच्यामध्येच आहे. तुम्ही, तुमची पत्नी आहांत, तुम्ही तुमचे पती आहांत. आतां तुमची पत्नी, जी बाहेर, तुमची पत्नी आहे, ती तुमच्या मनांत असलेल्या तुमच्या पत्नीशी जुळत नसेल, तर त्यामुळे तुम्ही विचलित होतां नये. कारण, ती पत्नी नेहमी तुमच्याबरोबर आहे. एकदा, ही समज आली की, की तुमची जोडीदारी, पती पत्नीचं सहजीवन पूर्णपणे योग्य होतं.

आतां, मी हे इतकं हलकं फुलकं कां करते आहे, तुम्हाला कळण्यासाठी की, विवाह ही गंभीर समस्या नव्हे. जो पर्यंत तुमचा आदर्श तुमच्या समोर आहे, आणि तुम्ही तो तुमच्या पत्नीवर लादण्याचा प्रयत्न करीत नाही, किंवा, पत्नी तो स्वतःच्या पतीवर लादण्याचा प्रयत्न करीत नाही. पत्नीला पत्नी राहू दे, पतीला पती. पण पत्नीने पती होऊ नये, पतीने पत्नी होऊ नये. तसं झालं तर ते कसं सुधारायचं मला कळत नाही. कारण तसं झालं तर ते फार असमंजसपणाचं, हास्यास्पद आहे.

आतां त्या सगळयांत मुख्य गोष्ट तुम्हाला कळायला हवी, ती ही कीं, मुलं व्हावी, म्हणुन तुम्ही विवाह केला आहे. रोमिओ ज्युलिएट होण्यासाठी नाही. तुम्हाला मुलं झालेली बरी. आणि सहजयोगींवांना झालेली मुलं साक्षात्कारी होणार आहेत. प्रभावी आत्मे होणार आहेत. त्यामुळे तुमच्या मुलांचा आदरपूर्वक संभाळ करा. मानाने, त्यांना बिघडवूं नका. सहजयोगामधल्या, त्या प्रेमाने, त्यांचा विकास करा.

आतां, आपल्या 'हंसा' चक्राने हे सुरु झालं आहे. आतां पहा, हंसाचक्र तुमच्या डावीकडे व उजवीकडे आहे. डावी ही स्त्री आहे. उजवा पुरुष. हंसावर ते भेटतात. जर त्यांच्यामध्ये संतुलन नसेल तर, अडचण उद्भवते. त्यांना बरोबरीचं असलं पाहिजे. पण सारखं नको. डावी ही डावी आहे. उजवी ही उजवी आहे. त्यामुळे डावी डाव्या बाजूला पाहिजे आणि उजवी उजव्या बाजूला. आणि जेव्हां ते इथे येतात तेव्हां ते विवाह करतात. हा मुद्दा आपल्याला माहित पाहिजे कीं, स्त्रीचं जे कार्य आहे, ते तिने प्रथम केलं पाहिजे. पतीचं जे कांही कार्य आहे, त्याने प्रथम ते केलं पाहिजे. आणि त्यानंतर जीवनाची दुय्यम कर्तव्ये वाटून घेतली जातील आणि कळतील. पण पत्नी कामाला जाते आणि पती मुलं पैदा करतो असं शक्य नाही. तो ते करुं शकत नाही. किंवा उलटही शक्य नाही त्यामुळे जे कांही कार्य आहे ते महत्वाचं आहे.

आई होणं, मला वाटतं, फार महत्वाचं आहे. आज तुम्हाला जर आई नसती तर कोणत्या पित्याने हे कार्य केलं असतं. सांगा मला, कोणत्या पित्याने ? तुम्ही कोणाचा विचार करुं शकतां कां ? कदाचित स्वर्गातील पित्याने पण या पृथ्वीवरील पित्याने - सर्व सहजयोग्यांवर कार्य करीत बघू दे मला, कोणीतरी आहे कां ? हे सगळे पिता, त्यांना तुम्ही स्वर्गामध्ये छान पैकी बसून सर्व खेळ बघायला बोलविता. पण काम करायला कोण येणार सगळी भांडी धुवायची, सर्व लहान मुलांचे कपडे धुवायचे, नी आई करत असते त्या सर्व गोष्टी करायच्या. ती हे सगळं काम प्रेम, आपुलकी नी कळकळीने करते आणि मुलं कशी वाढवायची ते तिलाच ठाऊक असतं ते आईचं काम आहे. तर, ते आईचं कार्य आहे. आई करुं शकते. पिता छानपैकी उत्तमपैकी स्वर्गात बसू शकतो. सर्व आभार पित्याकडे जातात. आणि आई इथे 'थँकलेस जॉब' करते आहे. ठीक आहे. हरकत नाही, तसं आहे. तर त्याचा स्वीकार केला पाहिजे. कांहीका परिस्थिती असेना, कांही स्थिती असेना. आतां हंसाचक्रावर हे समजलं पाहीजे कीं दोन्ही नाडयांना तुम्ही संतुलनात ठेवलं पाहीजे - डावी आणि उजवी.

पुरुष हा पुरुष आहे. स्त्री ही स्त्री आहे. ठीक आहे, स्त्रीने पुरुषावर वर्चस्व गाजवायला सुरुवात केली किंवा पुरुषाने स्त्रीवर वर्चस्व गाजवायला सुरुवात केली कीं ते संतुलन तुटलं. स्त्री, ही फार महत्वाची आहे हे एकदां तुम्ही समजून घ्या. स्त्री शिवाय तुम्ही इथे नसतां. बरोबर आहे ? स्त्रीशिवाय तुम्हाला साक्षात्कार मिळाला

नसता. पुरुष हा फार महत्वाचा आहे. पुरुषा शिवाय स्त्रीला अर्थ नाही. शक्तिला देवा शिवाय अर्थ नाही. ती कोणासाठी कार्य करीत आहे ? हे सगळं ती कोणासाठी करतेय ? देवाने संतुष्ट व्हावं म्हणून. जर कार्य संभाळायला कोणी नसेल तर, आपल्यामधील दोन्ही अस्तित्वं संतुलीत, जाण असलेली त्यांचा योग्य मान असलेली, योग्य भागीदारी करणारी, सुसंगत कां आहेत ? योग्य जाण, आदर, प्रेमभाव असलेली व्यक्तिमत्वं - तुमची हंसा ठीक होईल, तुम्हाला बरं वाटेल. विवाहविषयक तुमच्या कल्पना, स्त्रीविषयक, पुरुषांविषयक कल्पना, तुमच्या स्वतःविषयीचा तुम्हाला सुधारल्या पाहिजेत. ते महत्वाचं आहे कारण ती मोठी भावनिक गोष्ट आहे. आणि डावी बाजू नाजुक असल्याने, सर्व लोकांना, ज्यांची डावी बाजू कमजोर आहे त्यांना सर्दी होते आणि तुमच्या कफामुळे होणारे सर्व प्रश्न उद्‌भवतात.

भावनिक बाजूचं योग्य पोषण केलं पाहिजे. नीट लक्ष पुरवलं पाहिजे. आणि आपला आत्मसन्मान ही फार महत्वाची गोष्ट आहे हे कळलं पाहिजे. जे कांही माननीय असेल ते प्रेम नाही. प्रेम ही फार सन्मान्य गोष्ट आहे आणि ती माननीयता जर तुम्ही राखलीत तर तुम्ही कशा प्रकारे कांही प्रश्न सोडवूं शकाल त्याचं तुम्हाला आश्चर्य वाटेल.

प्रश्न - जगाच्या भविष्यकाळांत तुम्हाला स्त्री ही कशी काय आढळते.

श्रीमाताजी - महान स्त्रीयांनी पुरुष बनण्याचा प्रयत्न मुळीच करुं नये. ते भयानक आहे. स्वतःच्या माननीयतेमध्ये स्त्रीही स्त्री आहे. ती पृथ्वीमातेप्रमाणे आहे. तिला तिच्या शक्त्या माहीत नाही तीच फक्त अडचण आहे. पुरुषांशी झगडण्यात कांही अर्थ नाही. रथाच्या दोन चाकांप्रमाणे आपण आहोत दोन्ही बरोबरीचे, पण एकसारखे नव्हे. जर तिला आई म्हणून तिच्या शक्त्यांची जाण असेल तर स्त्री ही पुरुषापेक्षा नक्कीच जास्त प्रभावी आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे स्त्री आणि पुरुषांना वाटणारी असुरक्षितता, कीं, त्यांनी नेहमी एकमेकांविषयी आकर्षण वाटलं पाहिजे. त्यांनी नेहमी अशा प्रकारे योग्य पध्दतीने राहीलं पाहिजे कीं त्यांना आकर्षण वाटलं पाहिजे. एकमेकांविषयी लोकांना त्यांच्याविषयी आकर्षण वाटलं पाहिजे. आणि मग ही असुरक्षितता निघून जाते. तुमच्या अबोधितेमध्ये तुम्ही उंचावता, स्वतःच्या गौरवांत वाढता आणि, या हलक्या प्रकारच्या प्रदर्शनाची तुम्ही पर्वा करीत नाही. लोक जे अशा प्रकारचं जीवन व्यतीत करतात ते फार भयानक असतं ते तुम्हाला माहीत असेल.

.... मी म्हटल्याप्रमाणे, पहिल्यांदा पिता, मग पुत्र, मग माता, स्वर्गामध्ये कांही स्त्रीमुक्तिवादी चळवळ चाललेली नाही. प्रत्येकाचा व्यवस्थित मेळ बसला आहे. एलेन्राच्या पुस्तकांत त्याने म्हटलं आहे 'होली घोस्ट' म्हणजे आई होती.

..... आतां कुंडलिनी म्हणजे मातेचं तत्व - तुमच्यामध्ये असलेलं. आतां जेव्हां, आम्ही धर्मविषयक नवीन कल्पना विकसित करण्यास सुरुवात केली, त्यावेळी प्रथम आम्ही पित्याविषयी बोललो. मग पुत्रा विषयी. आणि 'होली घोस्ट' ही सुप्त गोष्ट राहीली. आतां तुम्ही बघता त्याप्रमाणे, आजची परिस्थिती अशी आहे की स्त्रीवादी जाणीव येत आहे. पण ती फार अयोग्य रित्या दिग्दर्शित केली आहे. चूकीच्या वाटेने जात आहे.

स्त्री किंवा मातृत्व हे गर्भाशयाचं तत्व आहे. पृथ्वीमातेचं तत्व आहे. जी पोषण करते, आपल्याला वाढविते, तिच्या चुंबकशक्तिने आपल्याला मार्गदर्शन करते पण जर जाणीव उजवीकडे असायला हवे असेल, पुरुषी हवी असेल तर आपल्याकडे भरपूर पुरुष आहेत. जर स्त्रीया पुरुष बनण्याचा प्रयत्न करत असतील तर, हा लंबक, या टोकापासुन त्या टोकाकडे जाणारा, तसं होईल ते. पण जाणीव ही आतां व्यक्त होण्यासांठी आलेल्या आईची आहे.

आणि ही जाणीव पुरुषाला कनवाळू, मायाळू, पोषक, शांत करणारं बनवते. पण जोवर आपली जाणीव पूर्तता गाठत नाही तोवर आपण पूर्णता साधू शकत नाही ही साधी गोष्ट आपण समजूं शकत नाही.

शंभर वर्षापुर्वी, किंवा, तुम्ही 50 वर्षापूर्वी असं म्हणू शकता, आक्रमक पुरुष हा मोठा शूर वीर मानला जात होता. पण आज करुणामय कारणांसांठी कार्य करतो तो, किंवा, जो समग्रतेबरोबर असतो आणि त्यांचं पोषण करण्याचा प्रयत्न करतो तो, 'हिरो' मानला जातो. त्यामुळे जेव्हां ही दोन्ही तत्व कार्यान्वित होतील त्यावेळी कुंडलिनी उत्थान पावेल.

## सौभाग्यकांक्षिणींना उपदेश

आतां तुम्ही वैवाहिक जीवनांत प्रवेश करीत आहांत. अजूनपर्यंत तुम्ही कुमारिका होता. आणि आतां तुम्हाला दुस-या जीवनांत, वैवाहिक जीवनांत प्रवेश करायचा आहे. तुमचा विवाह यशस्वी होईल असं पहाणं, ही तुमच्यावर फार मोठी जबाबदारी आहे. तुमच्या पतीला तुमच्या इच्छेप्रमाणे चळण लागेल. तुमच्या मुलांनी त्याप्रकारची शिस्त आत्मसात करावी असं तुम्हाला वाटतं, त्याप्रकारचं योग्य मातृत्व तुमच्यामध्ये जोपासण्यासांठी, तुमची योग्य ती वागणूक असेल, याकडे तुम्हाला पहायला हवं.

तुमच्या आईला - स्वत:च्या आईला, कधीकधी एका जागी नऊ नऊ , दहा दहा तास बसून राहीलेलं तुम्ही पाहिलं आहे. जागेवरुन हलणंही नाही. पण, मी अशी लोकं पाहीली आहेत, जी एका जागी दोन तासही

बसं शकत नाहीत. जरी ध्यान करत असले तरीही. मग ते उठतात, इतर सर्वांचा शांतताभंग करतात आणि खाली येतात. आपण आपल्या शिस्तीमध्ये कमी पडतो, याची ती खूण आहे; आपल्या पालकांनी आपल्याला शिस्त लावली नाही, आपण स्वतःला शिस्त लावली नाही याची.

पहिली गोष्ट ही की, तुमच्या स्वभावाची शिस्त आपण व्यवस्थित परिपूर्ण करुन घेतली पाहीजे. आणि जिला विशेष समर्पोचित ज्ञान आहे, आणि, ते ज्ञान व्यक्त करण्याची विशिष्ट शक्ति आहे, त्या पृथ्वीमातेचं प्रतिनिधीत्व करणारे लोक तुम्ही आहांत, त्याची ती खूण आहे. तुम्ही जे कराल, ते सर्व कुटुंबात आणि सर्व सहजयोग प्रणालीमध्ये परिवर्तित होईल, यविषयी, तुम्हाला फार दक्ष राहीलं पाहिजे. आतां, जेव्हां तुम्ही तुमच्या पतिशी विवाह करीत आहांत, तेव्हां, हे लक्षांत ठेवा की, तुम्ही पृथ्वीमाता आहांत. आणि तुम्हाला दिलं पाहिजे, आणि तुमच्यामध्ये शक्ति असल्याने तुम्ही देऊ शकतां. तुमच्यामध्ये अनेक शक्ती असल्याने तुम्हाला दिलं पाहिजे. त्याचा अर्थ तुम्ही एक प्रकारे वरचढ आहांत की, तुम्ही देऊ शकता. त्यामुळे दर वेळी तुमच्या अहंकाराने सतत उठून म्हणता नये की, 'मी हे कां करावे ? कां करावं ?'

आणि ज्यावेळी या स्त्रीत्वाचा आनंद तुम्ही उपभोगू लागाल त्यावेळी चांगल्या माता, चांगल्या पत्नी, आणि जबाबदार सहजयोगिनी होण्याचा प्रयत्न करा. लग्न झाल्यावर त्यांच्या पतीला ज्या सहजयोगापासून दूर नेण्याचा प्रयत्न करतात त्या जास्त शापित असतात. इतरांसाठी तुमच्या जीभेवर माधुर्य पाहिजे. तुम्ही काय बोलत आहांत त्याविषयी. तुम्हाला काळजीपूर्वक राहीलं पाहिजे, तुम्हाला जबाबदार राहीलं पाहिजे. सहजयोगामध्ये लग्न होत असल्याने तुम्ही विशिष्ट लोक आहांत.

हे तुम्ही लक्षांत ठेवाल अशी मी आशा बाळगते.

..... आणि गृहलक्ष्मी ही फार शक्तिशाली प्रथा आहे. भारतामध्ये एकप्रकारे सर्वोच्च मानली जाते. एखाद्या पंतप्रधानापेक्षा किंवा कोणत्याही सर्वोच्च स्थानापेक्षा जास्त अध्यात्मामध्ये गृहलक्ष्मीचं स्थान हे सर्वोच्च आहे. पण त्या सर्वतोपरी गृहलक्ष्मी हव्या. म्हणजे त्या खूप उघड्या हृदयाच्या, प्रेमळ आणि एकनिष्ठ प्रेम असलेल्या व्यक्ति महत्वाच्या हव्या.

आतां गृहलक्ष्मीच्या बद्दल खूप गोष्टी आहेत. स्त्रीच्या शक्ति दाखविणाऱ्या हजार एक गोष्टी भारतामध्ये आपण सांगू शकतो. स्त्रीयांना शक्तीची प्रत्यक्ष मूर्ती मानतात. पण गृहलक्ष्मी ही सर्वांत जास्त शक्तिशाली शक्ति आहे. प्रचंड प्रेम, करुणा आणि क्षमा यांची ती शक्ति आहे, जीवनामध्ये एक विशिष्ट भूमिका त्यांना

करावयाची असते हे स्त्रीयांनी शिकलं पाहिजे. अर्थात त्यांना खूप धार्मिक आणि शुध्द पवित्र असलं पाहिजे. त्या अबोधित स्वभावाच्या हव्यात, लबाड आणि कावेबाज नकोत.

उदा. आतां समजा मी खूप बारीक झाले तर माझी सगळी चक्र उघड्यावर येईल आणि मला त्रास होईल. त्यामुळे मला भरपूर पाणी प्यायला पाहिजे आणि भरपुर स्निग्ध पदार्थ खाल्ले पाहिजेत. त्यामुळे माझ्या चक्रांना संरक्षण मिळेल. ते आपल्या कामावर अवलंबून आहे. आणि आईकडे चरबी हवी. जर आईच्या अंगावर चरबी नसेल तर मुलांना हाडं लागतात, ठाऊक आहे ना ?

...... आणि स्त्रिया मेकॅनिकल आणि शुष्क झाल्या आहेत. आईचं वर्णन करणारी एक इंग्रजी कविता मी वाचली आहे 'आशिया खंडाएवढी मोठी माझी आई' आईवरची एक सुरेख कविता. सिनेतारकांनी आई असणं वगैरे या साऱ्या कल्पना पहाल तर निरर्थकपणा आहे. आणि मग ज्या खरोखर माननीय कार्य करीत आहेत त्या स्त्रियांबद्दल आदर नसल्याने स्त्रीयादेखील अशा प्रकारचं काम अंगीकारु लागतात. या देशामध्ये स्त्रीची स्थिती काय आहे ते तुम्हाला माहीत आहे. ती वेश्या आहे. मग काय होणार ? त्यांना वेश्यांसारखं आकर्षक दिसायला आवडेल.

माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की, मातृत्व हे स्त्रीचं सौंदर्य आहे. मातृत्व हे सौंदर्य आहे. निसर्गाविरुध्द जाण्याचा प्रयत्न करु नये.

या देशामध्ये गृहिणीला मान्यता दिली जात नाही, म्हणून, लोक अशाप्रकारे वागतात. पण सूक्ष्मातून प्रत्येक देशामध्ये गृहिणीला खूपच मान असतो. उदा. मी जर पार्टीला गेले तर, सौ. श्रीवास्तव म्हणून मला मान मिळतो. नाही कां ? पण जर माझ्या यजमानांची सेक्रेटरी गेली तर ती त्यांच्याशेजारी बसणार नाही, नाही कां ? आणि सुंदर स्त्री सेक्रेटरी आहे आणि विशेष चांगली न दिसणारी ती पत्नी आहे. समाजांत पतीच्या शेजारी कोण बसेल ? मला आतां हा प्रश्न आहे.

हॅम्बर्ग मध्ये आलेल्या सगळ्या गोष्टींचं एक वैयक्तिक उदाहरण मी तुम्हाला देते. हॅम्बर्गमध्ये देखील आणि आमच्या नोकरीतील कॅबिनेट सेक्रेटरी असलेले सर्वोच्च अधिकारी. त्यांची पत्नी फार स्मार्ट होती, जीन्स वापरायची आणि हे आणि ते सगळं जगांत ज्याला स्मार्ट म्हणतात ते आणि फ्रॉक्स घालायची हुबेहुब पाश्चात्य पध्दतीची स्त्री. आणि अर्थात मेजवानींसाठी ती साडी नेसायची पण ती देखील अत्यंत दिखाऊ साडी.

आणि आम्हाला रात्रीच्या जेवणाचं आमंत्रण होतं. मी, माझे पती आणि ती व तिचे पती, आणि ते फार मोठं डिनर होतं. बँकेचे, मोठी मेजवानी. तेव्हा तिच्या यजमानांबरोबर ती आली नाही. ती कांहीतरी कामांत व्यस्त होती म्हणून ती नंतर आली, की, लवकर! लवकर, ती लवकर आली, आणि, तीचे पती नंतर आले. जेव्हां सगळं कांही आलं तेव्हां, प्रत्येक जण नियमांनुसार प्रोटोकॉलप्रमाणे बसले ते उजवीकडे बसतात, त्या डावीकडे. आतां तिची जागा रिकामी होती. तिथे कोणीच नव्हतं. त्यामुळे ते म्हणाले, 'माझी पत्नी कुठे आहे ?' ते म्हणाले, 'तुमची पत्नी आलीच नाही.' नाही, मला वाटतं ती आली असेल. माझी खात्री आहे, ती आली असेल कारण, ती लवकर येईल असं ती म्हणाली होती. तेव्हां ती इथे असलीच पाहिजे. ते म्हणाले,'मला वाटतं, तुमची सेक्रेटरी आली आहे. तिला बोलावून विचारावं.' आणि ती त्यांची पत्नी होती. त्यांनी तिला दुस-या खोलीमध्ये ठेवलं होतं. तिला जर्मन नीट येत नव्हतं. मी त्यांची पत्नी आहे असं स्पष्टीकरण देण्याचा ती प्रयत्न करीत होती. आणि ते तीला सांगत होते की, आम्ही त्यांच्या पत्नीसाठी थांबलो आहोत. त्यांच्या पत्नीसाठी आम्ही थांबलो आहोत," बघा. मी त्यांची पत्नी आहे' अशी ती त्यांची खात्री करुन देऊ शकली नाही. तीने तिची आंगठी दाखविली, हे, नी ते आणि ते म्हणाले,'ठीक आहे, पत्नी येत आहे ना, ठीक आहे'. मला वाटतं, ते किती लाजिरवाणं होतं. आणि मुत्सद्दयांच्या वर्तुळांतसुध्दा. म्हणजे ते इतके नवीष्ट लोक असतात आणि तुम्हाला माहीत आहे, कोणालाही अशी स्त्री आवडत नाही.

एकदां मी सी.पी. च्या ऑफिसमध्ये गेले आणि लोक त्यांच्या कोटाची बटणं लावणं, वगैरे सगळं करुं लागले. म्हणुन मी सी.पी. ना म्हटलं,"ते बटण वगैरे कां लावत आहेत?" ते म्हणाले,'अचानक तुम्हाला पाहील्यावर त्यांना आदर वाटतो माहीत आहे कां ?' मी त्यांची पत्नी आहे हे त्यांना माहीत नव्हतं. पण त्यांना आदर वाटत होता. ते तुम्हाला बघतात. तुमच्या चेह-यावर आदर असतो. आणि तशी स्त्री बघणं हा त्यांच्यासाठी किती मुक्तता असते.

...... तसं आहे ते, वर्णन केलेल्या पध्दतीचा देखावा महत्वाचा नाही. आंतुन काय येतं ते महत्वाचं आहे. पूर्ण व्यक्तित्व काम असतं. आतां उदा. एखादा सहजयोगी सिनेतारा किंवा तारकेसारखा दिसण्याचा प्रयत्न करुं लागला तर तो लोकांवर कधीच छाप पाडू शकणार नाही. खोटे गुरुदेखील शांत, प्रसन्न व्यक्तिमत्व करुं दाखवायचा त्याचं शिक्षण घ्यायला जातात. तुम्ही पहाल तर, पोप ही तशाच प्रकारे दिसतो. लामांचंही तेच आहे. स्वतःला प्रसन्न व्यक्ति दाखविण्याचा ते प्रयत्न करतात. आणि सहजयोगी असलेली कोणतीही व्यक्ति, स्वस्तात मिळणारी, हलकी दिसते, असं कोणालाही मिळणार नाही. पुर्णत्वाप्रमाणे प्रत्येकाला गौरवांत रहायला पाहिजे तशी व्यक्ति खरोखर, आपोआप, सहजगत्या आपल्या चारित्र्याने ख-या अविर्भावांनी, सर्व गोष्टींनी इतरांवर छाप पाडणारी होते, दांभिक नव्हे पण खराखुरा सहजयोगी. त्याचा अर्थही आपोआप असा होतो की तुमच्या अस्तित्वाचा तुम्ही

मान राखता जसं तुमची शुध्दता, पावित्र्य यांचा आदर रहाणार नाही अशा प्रकारे तुम्ही वागतां नये. तुमची धर्माची संवेदना, या सा-या गोष्टींचा तुम्ही आदर राखला पाहिजे. त्या सा-याचा परिणाम म्हणून तुम्ही असे अर्वाभिव्यक्त करता जे अद्वितीय असतील.

.... पाश्चात्य देशांत अशी परिस्थिती आहे, हे आपण जाणलं पाहिजे. चित्त जास्तकरुन बाहेर दिलं जातं, आंत नाही. त्याविषयी आपण काळजीपूर्वक राहीलं पाहिजे. कल्पना करा, स्त्रीया वेश्यांसारख्या आहेत आणि उद्या त्या शिक्षिका बनतील. भारतामध्ये आम्ही तसा विचार करुच शकत नाही. तशा गोष्टीची कल्पना करणं, अजिबात शक्य नाही.

पहा, दुस-याही गोष्टीचं मला आश्चर्य वाटत होतं. मला वाटतं, ती स्त्री बहुधा पन्नास किंवा चाळीस वर्षांची असावी. तिच्या पहिल्या पतीला घटस्फोट दिला आहे. आणि मला दुसरा पती मिळालाच पाहिजे, असं ती म्हणते, - चाळीसाव्या पन्नासाव्या वयांत ! भारतामध्ये एखादी मुलगी एकविसाव्या वर्षी विधवा झाली तरी, ती किती उच्च स्थानावर असते. म्हणजे मी म्हणते आहे ती किती उदात्त भावना ठेवून असते. ती कशाची काळजी करत नाही. लग्नाशिवाय त्या सुखी असतात. पण इथे, तुम्ही स्त्रीविषयी तशी कल्पनाच करुं शकत नाही. कारण तुमच्या स्त्रीया स्त्रीया नाहीत, त्या पुरुषांसारख्या आहेत, बघा.

त्यांची पत्नी वारली तर, भारतामध्ये कितीतरी पुरुष विवाह करीत नाहीत. ते विवाहच करत नाहीत. कारण एकदां झालं ते संपलं, झालं. पण इथे, चाळीस, पन्नास, साठ वर्षांच्या वयाला त्यांना बायका हव्यात. त्याचा अर्थ आई साठ वर्षांची आणि पांच सहावेळा तिचं लग्न झालेलं असतं. मला कळत नाही, तो मूर्खपणा आहे.

......कारण ते निरोगी नव्हे. नातं निरोगी नसतं. हा प्रश्न आहे, जर ते निरोगी पूर्णत्वाच असेल तर, ते खूप गहनातलं असतं. तो खूप अंतर्यामीचा संबंध असतो. जिथे तुम्ही दुस-या स्त्रीच्या मागे किंवा दुस-या पुरुषाच्या मागे लागण्याचा विचार करीत नाही. एकदा कां विवाह झाला की, ते सारं संपतं. कारण, तुमच्याकडे वैवाहिक जीवनासारखी पध्दत असेल तर, तुम्हाला तुमच्या घरांत असल्यासारखं वाटेल. जसं तुम्ही दुस-या कोणाच्या घरी गेलांत तर तुम्हाला वाटतं, आता निघायला हवं. तुम्हाला घरी परत गेलं पाहिजे. आणि हे तुमचं घर नाही तुम्हाला घरी परतायला हवं.

विवाह हा तसा आहे. आतां तुमच्या ध्येयाप्रत तुम्ही पोहोचला आहांत. तेव्हा आतां तुम्ही स्थित व्हाल. अजून तुमच्या ध्येयाच्याबाबतीत तुम्ही घुटमळीत आहात. तो वेडेपणा आहे. नुसता असा प्रयत्न करा ते कसं कार्यान्वित होतं त्यांच तुम्हाला आश्चर्य वाटेल, नुसता प्रयत्न करा.

जसं इस्लाममध्ये आहे, त्यावेळी प्रश्न असा होता की अनेक स्त्रीया होत्या आणि पुरुष म्हणजे महंमदसाहेबांना जमातीच्या वाचांबाची, हल्ले, अशा अडचणींना तोंड द्यावं लागलं तेव्हां अनेक पुरुष मारले गेले होते. आणि स्त्रीया उरल्या होत्या. इतके कमी पुरुष असल्याने वेश्याव्यवसायाला सुरुवात झाली असती. त्यामुळे महंमदसाहेब म्हणाले, तुम्ही चार बायका करु शकता. त्यांच्याशी विवाह करा. पण त्या मुली तरुण होत्या आणि तरुण मुलं मारली गेली होती. त्यामुळे त्यावेळी तरुण पुरुष नव्हते. ते म्हणाले, ठीक आहे, तरुण मुलींशी विवाह करा - पण 'विवाह' करा. मुद्दा, मुळ मुद्दा हा होता की तुम्ही विवाह केला पाहिजे - आणि अवतरणाचा हा दृष्टीकोन 'सम्याचार' म्हणुन ओळखला जातो. म्हणजे, त्या क्षणाला, जो कांही प्रश्न असेल त्याला त्याप्रकारे सोडविण्यात येतो. आतां जर काळ बदलला तर, त्याच्या अनुषंगाने हा सम्याचार बदलला पाहिजे. आणि त्यासाठी तुम्हाला समयोचित ज्ञान हवं.

आपल्या चारित्र्यासाठी लौकिक असलेल्या शिवाजी महाराजांना चार वेळा विवाह करावा लागला, कारण, त्यांना कांही कार्य करावयाची होती. आणि द्रौपदीला पांच पतींना वरावं लागलं. कारण त्यांच्या मातेला त्यांनी तसं वचन दिलं होतं. आणि कृष्णाला सोळा हजार स्त्रीयांशी, ज्या त्याच्या शक्त्या होत्या, त्यांच्याशी विवाह करावा लागला. कारण असं बघा त्यांच्याकडे सहजयोगीनी नव्हत्या.

एका दमांत कृष्णाने विवाह केले. त्या, त्याच्या पत्नी होत्या, असं एका दमांत, त्याने तुरंत जाहीर केलं. आतां पहा, त्यांनी कशी लिला केली. माझ्या शक्त्या प्रवाहित होण्यासाठी मला जसे तुम्ही हवे आहांत, तसे त्यांना त्यांच्या शक्त्या हव्या होत्या म्हणून त्यांनी काय केलं, त्या स्त्रीयांना त्या ठिकाणी जन्म दिला. एका भयानक राक्षसाने त्यांना पकडलं. त्यांनी राक्षसाला ठार केलं आणि सगळ्या सोळा हजार स्त्रीया ज्या त्याच्या शक्त्या होत्या त्यांना सोडविलं. आणि तशा प्रकारे कार्य केलं. पंचमहाभुतें सुध्दा त्यांच्या पत्नीच होत्या.

आतां कल्पना करा, लोकसंख्यावाढीच्या या काळांत मला इतकी मुलं आहेत. लोकसंख्येत इतकी वाढ झालेल्या भूमीमध्ये, मला इतकी मुलं आहेत म्हणून लोक टीका करतील आणि लोक म्हणतील, आम्हालापण इतकी मुलं हवी. माताजींना आहेत, तो मुर्खपणा आहे, हा सम्याचार आहे. जसं सम्याचाराप्रमाणे मला सर्वसामान्य असायला हवं, म्हणून, मी कोकाकोला घेते पण त्याचा असा अर्थ नाही की तुमचा आत्मसाक्षात्कार मिळवण्यासाठी तुम्ही कोकाकोला घ्यावा.

दिल्ली

हृदय ते सहस्त्रार                                9-2-1981.

स्त्रीला सभ्य व्यक्तिमत्व हवं. आणि हे आव्हान तिने स्वीकारु नये. पुरुषांकडून हे आव्हान स्वीकारणं सुज्ञपणाचं नाही. कमीतकमी भारतीय स्त्रीयांना ते ज्ञात आहे. बहुतेक स्त्रीया ते जाणतात. ते तसंच ते चालूं ठेवतील अशी मी आशा करते. पण स्त्रीयांना मान राखला पाहिजे हे आतां पुरुषांना कळायला हवं. त्यांच्या स्त्रीयांचा मान जर त्यांनी राखला नाही तर, त्यांना होणा-या मुली त्यानुसारच होतील आणि असे परिणाम दाखवतील की, पुरुषांना शॉक बसेल. एकाद्या दिवशी स्वतःच्या वडिलांच्याही त्या थोबाडीत देतील. ते शक्य आहे. अशा प्रकारच्या गोष्टी या देशांतही होऊं शकतील.

मी हे सांगितलं कारण, ही दोन चक्रं फार महत्वाची आहेत. श्री राम, जे मर्यादेची देवता आहेत. सीमेची, मानवप्राण्याने कसं जगावं, त्याची, जीवनभर लोकांना आत्मसाक्षात्कार देण्यामध्ये त्यांनी विशेष उत्सुक्ता दाखविली नाही. पण अर्थात, त्यांनी रावणाचा नाश केला. आणि अनेक राक्षसांचा विनाश केला, पण त्यांच्या जीवनाचा मुख्य संदेश म्हणजे स्वतःच्या पत्नीवर अतोनात प्रेम करणारा, एकपत्नीव्रत पालन करणारा पती. आणि आदर्श राजा असल्याने स्वतःच्या प्रियतमेचा त्याग करणारा असा पुरुष, असा आहे.

या देशांत, जिथे प्रेम महान आहे असं आपल्याला वाटतं तिथे याउलट आढळतं. आपण ऐकतो आणि मला खूप मंत्री ठाऊक आहेत ज्यांच्या पत्नी कुटुंबावर सत्ता गाजवितात. तिथे त्याग नसतो. त्याउलट, बायका इतक्या महत्वाच्या असतात कीं, नव-यांना त्या कोप-यांत बसवितात आणि कोणीही त्याविषयी कांहीही बोलत नाही. ती कोण आहे, तुमचा मुलगा कोण आहे, तुमची मुलगी कोण आहे, किंवा कोणीही कोण आहे. कोणालाही त्याची क्षिती नसते. त्यांची मुलं इतक्या महत्वाची आहेत असा विचार करण्याचा जे लोक प्रयत्न करतात त्यांना हे कळलं पाहिजे कीं, श्री रामांनी त्यांची प्रियतमा गर्भवती असतांना तीचा त्याग केला आणि तीची आठवण करत त्यांनी सन्यस्त जीवन व्यतित केलं. श्रीरामांसाठी हा त्याग फार जास्त होता कारण, ते तीच्यावर खरोखर प्रेम करीत होते. तिच्याशिवाय रहाणं त्यांना शक्य नव्हतं. ते त्यांच्यासाठी फारच जास्त होतं. आणि मग वेळ आली तेव्हां सीताही त्यांना सोडून गेली. तिच्या स्वतःच्या गौरवांत आणि स्वतःच्या प्रांतात ती त्यांना सोडून गेली. तिने त्यांना तिच्या शरीराला स्पर्श करुं दिला नाही. स्त्रीला आलं पाहीजे, त्याप्रमाणे, ती नुसती अदृश्य झाली.

आतां आधुनिक युगांत तसं नाही. पतीने जर तुम्हाला त्रास दिला असेल तर तुम्ही कोर्टात जाता. त्याला ती तुरुंगांत पाठवते, आणि त्याला चांगली शिक्षा मिळते आहे की नाही ते पहाते. कां, तर आपण

इतर स्त्रीयांमध्ये नर्क होतो. आतां मी काय म्हणते आहे, तुमच्या पतीवर जर तुम्ही करता, आणि म्हणून जर तुम्ही रागवला असाल, तर त्याला इतर स्त्रीयांशी कांही करायची गरजच नाही. कशाला तुम्ही त्याला तुरुंगात पाठवलं, कां त्याला त्रास देतां, कां त्याचे हालहाल करतां ?

सहजयोगींसाठी पतीपत्नींचं नातं अत्यंत महत्वाचं आहे हे आपल्याला कळलं पाहीजे. तुम्ही एकमेकांच्या पूरक शक्ति आहात. जर हे नातं बरोबर नसेल तर, सहजयोग कार्यान्वित होणार नाही. स्त्री वर्चस्व गाजवते असं नाही पण ते सारं पूरक असतं. दोघांमधलं प्रेम, प्रेमाचं सौंदर्य आणि मान.

ते प्रेम करतात, हे दाखविण्यासाठी, सर्व प्रकारचे आविर्भाव लोक करतात हे मी पाहिलं आहे. देखावा नको, पण तुमच्या पतीसाठी हृदयापासून तुम्हाला तसं वाटलं पाहिजे. पतीला ते प्रेम जाणवलं पाहिजे. तेच एक नातं सर्वांत सुरेख आहे. मुलं जेव्हां कमई लागतील तेव्हां मुलांबरोबरचं तुमचं नातं तुम्हाला कळेल, लग्न झाल्यावर कन्येबरोबरचं आणि वय झाल्यावर तुमच्या आईवडिलांशी तुमचं नातं तुम्हाला कळेल.

तुम्ही मोठ्या आहात. तुम्हाला तुमची पत्नी आहे, त्यांना अहंकार - गर्व माझ्यांना तुम्हाला दिसेल पण तुमच्या पत्नीबरोबरचं तुमचं नातं म्हणते अत्यंत वैयक्तिक, आणि अत्यंत मौल्यवान नातं आहे. म्हणूनच लोकांनी त्याविषयीं इतक्या कविता केल्या आहेत, इतक्या गोष्टीही. भारतीय भाषेमध्ये 'हितकारी' नसलेलं कांहीही स्वीकारलं जात नाही. कारण त्याला 'साहित्य' म्हणतात. साहित्य म्हणजे 'सह' 'हित'. जे तुमच्याबरोबर असतं..... तुमच्या आत्म्याबरोबर. फक्त तेच साहित्य आहे. वाग्मय ललितलेखन हे साहित्य आहे. जे नाही, साहित्य नाही तो कचरा आहे. आणि संस्कृतमध्ये श्री यण तुमच्या पत्नीबरोबर नसेल तर ते अश्लील आहे तुमची पत्नी किंवा जी तुमची वाग्दात वधू असेल तिच्याबरोबरच ते असलं पाहिजे.

ती इतकी पवित्र गोष्ट आहे. हे पावित्र्य कशाप्रकारे उपभागायचं हे जर लोकांना समजलं तर ते स्वतःच पवित्र होतील आणि त्यातलं सर्वोत्तम सार त्यांना मिळेल. असं बघा, कांही विकत घेण्याची गोष्ट झाली तर, आपल्याला प्युअर मिल्क लागतं. पवित्र खडा लागतो, शुध्द सोनं लागतं, आणि प्रेमाची गोष्ट आली तर नाना प्रकारच्या अशुध्द गोष्टींची, विकृत गोष्टींची सरभेसळ आपल्याला हवी असते आणि नंतर आपण म्हणतो, 'अरे, मी दमलो, मला कांही यांत आनंद मिळत नाही.' कारण ते शुध्द, पवित्र नसतं.

नात्यांमधल्या पावित्र्याचा आनंद लुटायचा असतो. सहजयोगामध्ये आपण संन्यासावर विश्वास ठेवत नाही कारण असे अनेक महात्मे आहेत ज्यांना या पृथ्वीतलावर जन्म घ्यायचा आहे. आणि त्यांच्यासाठी आपल्याला व्यवस्था करायची आहे. एकमेकांविषयी आदर बाळगणारे, एकमेकांवर प्रेम करणारे, सुखी वैवाहिक जीवन

व्यतित करणारे लोक आपल्याला हवे आहेत म्हणजे इथे महान संत जन्म घेऊ शकतील.

जोपर्यंत आपल्या पत्नीचा आपण आदर करत नाही, त्यांच्याकडे योग्य ते लक्ष पुरवीत नाही. त्यांना योग्य ती मदत देत नाही तो पर्यंत या देशाची शिस्त सुधारणार नाही. मुलांना शिस्त लावणारी ती, ती आहे. तिला पूर्ण सुरक्षिततेची जाणीव देणं महत्वाचं आहे. आणि पुरुषांचा अहंकार गेला पाहिजे. त्याला वाटतं, तो फार महत्वाचा आहे. तसं नव्हे. ते दोघंही महत्वाचे आहेत. जर ते बरोबर असले तर पूर्ण ऐक्य महत्वाचं आहे. एका डोळयाने तुम्ही जगू शकत नाही. तुम्हाला दोन्ही डोळे लागतात. एका डोळयाला वाटत असेल तो महत्वाचा आहे तर, त्याचा अर्थ एक डोळयाने नाहीसं व्हावं आणि त्याच्याशिवाय काय होतंय ते पहावं.

तुम्हाला जर पावित्र्याची संवेदना नसेल, तर इतरांबरोबरच्या तुमच्या नात्यांमध्ये तुम्ही डावी विशुध्दी विकसित करता, आणि डाव्या विशुध्दीबरोबर तुम्ही अनेक प्रश्न निर्माण करता.

तुम्ही पुरुष आहांत अशा प्रकारचा विकृत दृष्टीकोन ठेवून वागण्यापेक्षां पुरुषांसारखे वागा. स्त्री असाल तर, स्त्रीसारखं वागा. तुम्ही जर पुरुष किंवा स्त्री प्रमाणे वागाल, म्हणजे स्त्री पुरुषांसारखी वागू लागली, आणि पुरुष स्त्रीसारखे वागू लागले तर तुम्हाला समजलं पाहीजे तुमचे स्नायू तुम्ही जे तयार झालेला आहात त्याप्रमाणे तयार होतात.

## सहजयोग व समाज यामध्ये मातेची भूमिका

'मातृत्व हे फार महत्वाचं आहे ही गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे, हे विश्व निर्माण करणारी माताच आहे. पिता हा फक्त साक्षी होता'

– श्री माताजी निर्मला देवी

संपूर्ण समाजाच्या मुलांना माता [illegible] देतात. [illegible] माताच असंतुलित असेल तर, समाज समतोल रहाणार नाही आणि फोफावणार नाही. सध्या पाश्चात्य देशात असंच होत आहे. हे संतुलन आणि स्थैर्य माता कशी काय साध्य करते ?

सर्वप्रथम गोष्ट ही की, त्यांची शुध्दता, तिचा आदर केला पाहिजे, तिचं रक्षण केलं पाहीजे. नुसत्या स्थूल स्वरुपांत नव्हे. त्यांच्या डोळयांनी, त्यांच्या मनाने त्यांच्या पतीबरोबर त्यांनी निष्ठावान राहील पाहिजे. तसंच त्यांच्या पतींनी सुध्दां इतर स्त्रीयांकडे भिरभिरत्या नजरेने पाहातां नये किंवा इतर स्त्रीयांशी.

समाजाचं चित्त वासनेपासुन दुर ठेवण्यासाठी सर्वसामान्यपणे स्त्रीया कशा प्रकारचा पोशाख करतात, ते महत्त्वाचं आहे. कपडे स्त्रीत्व दर्शवणारे आणि उत्कृष्ट अभिरुचि दाखविणारे हवे. कोणत्याही प्रकार उत्तान, हलक्या प्रतीचे नको.

विवाहापूर्वी कौमार्यभंग झाल्याने तरुण मुलींची सुज्ञता हरवून जाईल आणि त्यानंतरचं तीचं जीवन ख-या प्रेमाशी काहीच नातं नसणा-या आणि अध्यात्मिक पातीला जागा न ठेवणा-या अहंकाराने साकारून ठेवलेल्या रोमान्सेसनी उभारलेलं असतं.

दुसरी आणि तिसरी गोष्ट म्हणजे मोझेस ने सांगितलेल्या दहा धर्माज्ञांवर आणि आदिगुरु दत्तात्रेयांच्या इतर अवतरणांनी शिकविलेल्या शिकवणुकीवर आधारित धर्मा नुसार कौटुंबीक जीवनाची प्रतिष्ठापना झाली पाहीजे.

अध्यात्मिक उत्क्रांतीप्रत नेणारी शुध्द विद्या, हीच या शिकवणीच्या मर्यादा उभारते. म्हणजेच दुस-या शब्दांत, योग्य वर्तणूक काय आणि अयोग्य वर्तणूक काय ते प्रस्थापित केलं पाहिजे. आणि, त्यानंतर, योग्य वर्तणुकीला धरुन चाललं पाहिजे.

त्यामुळे कुटुंबांत वाढणा-या मुलांना उदाहरणांवरुन, आणि, आईवडिल शिकवतात ती योग्य वर्तणूक, या दोन्हींमधून शिकायला मिळेल, कीं, खरं, बरोबर वागणं कोणतं.

मुलाला सतत स्वच्छ ठेवणं आणि क्षमा करुन काळजीपूर्वकरित्या, त्याला सुधारणं हे आईचं कार्य आहे. पण त्याहूनही जास्त म्हणजे, स्वतःच्या प्रेमळ उदाहरणाने मुलाला वागण्याची योग्य पध्दत दाखविणं हे आहे.

मुलाचं नुसतं शारिरीकरित्या पोषण करता नये, पण, त्याला भावनिक सुरक्षितता दिली पाहीजे. त्यामुळे धार्मिक कौटुंबिक जीवनाच्या पार्श्वभूमीवर त्याची अध्यात्मिक प्रगति व्हायला वाव मिळावा.

चौथी गोष्ट म्हणजे, स्त्रीचं तिच्या पतीशी योग्य नात हवं. श्री सीताजी, श्री रामांची प्रेमळ आणि आज्ञाधारक पत्नी होती. त्या नात्यावर आधारित असं हे नातं असावं.

स्त्रीयांनी त्यांच्या पतीची काळजी घ्यावी, त्यांचं पोषण करावं घर स्वच्छ व व्यवस्थित ठेवावं. पतीला आवडणारं अन्न देऊन त्यांनी त्यांचे पोषण करावं, पतीवर हुकूमत गाजविणार, आक्रमक बनू नये. उलट

पतीने उपजिवीकेसाठी अर्थार्जन करावं आणि स्त्रीने गृहकृत्ये सांभाळावी.

त्याबद्दल पतीने मुलं वाढविण्यांत पत्नीला मदत करावी आणि पत्नीशी पूर्णपणे एकनिष्ठ राहून पत्नीला आर्थिक व भावनिक सुरक्षितता द्यावी. त्यांचं नातं प्रेमाचं असावं, वासनामय कधीच नसावं. आपुलकीचं कोणत्याही प्रकारचं दर्शन दोघांमध्ये खाजगी व पवित्र्य असावं लोकांत कधीही त्याचं प्रदर्शन करु नये.

पती पत्नींनी एकमेकांना आदराने वागवावं, ज्यामुळे, मुलं ते पहातील. आणि योग्य प्रकारे मातापित्यांचा आदर ठेवून वाढतील. यामुळे त्यांच्या स्वतःच्या आत्मसम्मानाच्या वाढीसाठी सुध्दा योग्य वातावरण तयार होईल.

स्त्रीने तिच्या नात्यांमध्ये अत्यंत पवित्र्य टेवलं पाहिजे. ज्यामुळे भाऊ बहिणींच्या नात्याचा विकास होईल. स्वतःच्या पतीविषयी तिने मालकी असल्यासारखा हव्यास तिने बाळगू नये. पण इतरांबरोबर बंधू, पिता म्हणून त्याचा इतरांशी येणारा संबंधही आनंद तिने उपभागावा. इतरांशी त्याचं नातं शुध्द असेल तर मत्सर वाटू नये.

कुटूंबांतील वयोवृध्द मंडळींना आदरभावाची वागणूक द्यावी आणि मुलांना कोणत्याही प्रकारे कमी लेखणे, चिडवणे असं करु नये.

आत्मसाक्षात्कारी मुलं असल्याने घराशी जास्तच शिस्त आईने मुलांना लावावी. कारण त्यांचा अहंकार जास्त वाढण्याचा संभव असतो. ही मुले म्हणजे देव नव्हेत आणि तशा प्रकारची वागणूक त्यांना देता नये आणि गरज असेल तेव्हां त्यांचं वागणं सुधारुन घेतलं पाहिजे.

क्षमा आणि करुणा या स्वतःच्या गुणवत्ता आईने विकसित केल्या पाहिजेत. आणि सर्व मुलांना ती स्वतःचीच असल्यासारखं प्रेम व करुण दिली पाहिजे.

शेवटी 'माता' या शब्दाचा संपूर्ण अर्थच आजपर्यंत या पृथ्वीवर आलेल्या अवतरणांतील सर्वांत महान असं जिवंत अवतरण, जे आदिशक्ति, ती स्वतःच आपल्यामध्ये असल्याने आपल्यावर अनंत आशिर्वाद आहेत.

आपण, ज्यांना स्त्री म्हणून जन्म घेण्याचं भाग्य लाभलं आहे, त्यांनी, आपल्या दैनंदिन जीवनात त्यांचं उदाहरण अनुसरलं पाहिजे इतकंच नव्हे तर, स्वतः च्या कुंडलिनीवर ध्यान करतांना आपली मुळं खोलवर रुजवली पाहिजेत. आपल्या स्वतः च्या अस्तित्वाच्या अंतर्यामी त्याच्या गुणवत्ता आत्मसात केल्या पाहिजेत.

आपल्या स्वतः च्या आयुष्यात दैवी मातृत्वाची गुणवत्ता व्यक्त व्हावी हे आपलं ध्येय असलं पाहिजे आपल्या घरात, आपल्या कुटुंबात, आणि सर्व मानव जातीत या दैवी चैतन्यलहरी आपण पोहोचवाव्या अशी आपली महत्त्वाकांक्षा असली पाहीजे.

'जर तुम्ही आदर्श बनला तर, आदर्शाची शक्तिच तुम्हाला इतकं प्रभावी बनवेल की, इतर कोणाचा सल्ला घेण्याची तुम्हाला गरज नाही. तुम्हीच स्वतः आदर्श बनला. ते मशालीसारखा असतात. तुमचे आदर्श स्वतः च प्रकाशित असतील.'

..... गौरीची शक्ति असलेली व्यक्ति कोणत्याही जागी गेली की, प्रत्येकाची कुंडलिनी उत्थान पावते, फक्त वंदन करण्यासांठी तुमच्यामध्ये जेव्हां गौरीची शक्ति असते तेव्हां तुम्ही उठून दिसतां, कारण, ते तुमच्याकडे ते अजाण, चकाकणारे डोळे असतात आणि तिथे तुम्ही दृष्टी जाते, अगदी एक कटाक्ष देखील तावडतोब कुंडलिनी वर चढवितो.

..... जेव्हां आपल्याला एखाद्या विषयी हव्यास, किंवा, तीव्र वासना विरहीत प्रेम वाटतं तेव्हां ते आपल्या मधलं दैवी प्रेम असतं. ते शुध्द प्रेमाचं मूर्तिमंत रुप आहे. जे फक्त प्रेम करतं, ज्याने तुम्हांला हे सुरेख मानवी जीवन दिलं आहे, आणि, तुम्हाला त्याहून जास्त सुंदर करावं असं त्याला वाटतं. ही सर्व निर्मिती त्याने तुमच्यासांठी केली आहे. या निर्मितीत सर्व भागांचा आनंद तुम्ही लुटावा ही त्याची इच्छा आहे. त्याच्या राज्यामधील रहिवासी आणि त्याच्या कृपाप्रसादांच्या आनंदात राहाणारे म्हणून तुम्ही सर्व उपभोग घ्यावा अशी त्याची इच्छा आहे.

रामाचा स्वभाव शांत आणि मोकळा होता. इतरांना उत्तम सल्ला देणे, किंवा स्वतः ला काय चांगलं वाटतं, ते सांगून इतरांना त्यांचा चूका निदर्शनाला आणून देणे, असं कांही त्याने केलं नाही. कधी राखून ठेवायचं, कधी खर्च करायचा, ते त्याला माहीत होतं. माणसाची पारख तो उत्तमरित्या करीत असे. इतरांचं हृद्गत त्याला उमगत असे. इतरांच्या कमतरतेपेक्षा स्वतः च्या चुका त्याला चांगल्या प्रकारे माहीत होत्या. तो उत्तम वक्ता असून प्रभावी शब्दांच्या सांखळीने तो इतरांना पटवून देत असे. शंभर इजा करुन घेण्यापेक्षा थोडा फायदा त्याला

महत्त्वाचा वाटे. त्यांच्या आसपास वाईट अपघात कधीच झाले नाहीत. प्रत्येक भाषा तो बोलू शकत होता. आणि सोनेरी बाण मारणारा उत्कृष्ट धनुर्धारी होता. स्वत:साठी तो जी गोष्ट पसंत करेल, ती इतर सर्वांसाठी सदैव उत्तम असेल, यावर त्याचा विश्वास नव्हता.

राम दयाळु आणि सभ्य, शिष्टाचारयुक्त होता. दुष्ट मुळीच नव्हता. कठोर शब्दांबद्दल त्याने कोणाला दोष दिला नाही. उबदार अंत:करणाचा, कनवाळू आणि सर्वांचा खराखुरा मित्र होता तो. योग्य प्रकारे जीवन जगण्याचा त्याने प्रयत्न केला. आणि त्याला वाटलं होतं त्यापेक्षां ते सोपं असलेलं त्याला आढळलं. राजाचे कर त्याने गोळा केले त्यामुळे अर्ध्यांहून अधिक लोकांना खरोखर त्यांना कांही हरकत वाटली नाही. फार लक्षणीय राजपुत्र होता तो. आणि पांच सहा मुर्खां व्यतिरिक्त प्रत्येक कोसल नागरिकाचा तो आवडता होता. आदरातिथ्य करणं हा त्याचा स्वभाव होता. प्रत्येक अतिथीशी तो प्रथम स्वागतपर शब्दांत बोलत असे. तो फार शक्तिशाली पुरुष होता. पूर्ण जगाला तो रागवूं शकत नव्हता किंवा विश्वाला. त्यामुळे त्याचा कोप किंवा त्याचं सुखसमाधान कधीच फुकट गेलं नाही.

राम सुट्टी न घेतां सतत काम करीत रहात नसे. मित्राला अभिवादन करण्यासाठी थांबल्याशिवाय, तो फार लांब चालत जात नसे. स्मितहास्य न करतां, लांबलचक भाषण करत नसे. त्याच्या मनोरंजनाच्या गोष्टी, नृत्ये वगैरे जगामध्ये सर्वांत उत्तम होती. सीतेवर त्याचं गीतांत प्रेम होतं. ती त्याच्या जीवनाचा एक भाग असल्याने त्यांनी जीवन स्वत:च्या मित्रांसाठी ब-याचदां नवीन भेट ते शोधत. कामाशिवाय अख्खा दिवस घालवावा लागेल अशी भिती त्यांना वाटत नसे. त्यांनी जे कांही केलं ते, त्यांनी ते कशाप्रकारे केलं त्यामुळे, ते झालं.

बालकांडामधून,

जेव्हां राजा जनकांनी स्वत:रामाचा सीतेशी विवाह लावला. त्यांनी म्हटलं, 'रामचंद्रा, चंद्रासमान असणा-या रामा, तुझं जीवन जगण्यासाठी सहचरी म्हणून सीतेला वागव, तिच्याकडे पहा, पुरेसं होईल इतकं तिच्याकडे कधीही बघू नको, प्रेमाच्या नजरेने तिला ह्दयांत जतन कर. सीते, चिरंतनासाठी त्याच्यावर प्रेम कर. त्याची पत्नी म्हणून त्याच्याबरोबर चाल, त्याच्या स्वत:च्या छायेसारखी सतत त्याच्या मागोमाग जा. मी तुझा विवाह करीत आहे.'

जनकाने सीतेला सांगीतलं, 'युवतीचं रक्षण तिचा पिता करतो पण, एकदां कां तिचा विवाह झाला की तिने नेहमी तिच्या स्वामीचं संरक्षण घेतलं पाहिजे. आतां तू मला सोडत आहेस. पण तुझ्या (पृथ्वी) मातेला सोडत नाहीस.'

राम एकदाच सीतेकडे गेला आणि म्हणाला, 'वेळ पटकन उडून जाईल आणि लवकरच मला परतताना तूं पहाशील' तिने हळूच उत्तर दिलं, 'माझे स्वामी, जगांतील सर्व पुरुषांमध्ये तुम्हीच हे ऐकलं नाही की, पति पत्नी एक असतात, हे आश्चर्यच आहे.'

वनामध्ये आनंद नाही. राम म्हणाला, तिथे भय आहे, सिंह गर्जना करीत असतात, त्यांच्या गुहेच्या मुखांतून लक्ष ठेवून असतात, धबधबे कोसळतात कानांना इजा देतात आणि जंगल दुःखाने भरलेलं असतं' सीता म्हणाली, 'तुमचं भविष्य तेच माझंही अवश्य आहे' पिसाळलेले मन्दोमत्त हत्ती त्यांच्या रागाच्या आवेशांत माणसांना पायाखाली चिरडून यमसदनाला पाठवितात 'शहरांमधील राजे त्यांच्या विश्वासू मित्रांशी कोणत्याही प्रहरी, दिवसा रात्री कधीही कत्तल करतात.'

'खाण्यासाठी' जास्त कांही नाही पण, वाऱ्याने खाली पडलेली फळं आणि पांढरी मुळं इतकंच.' तुमचं खाऊन झाल्यावर मी ते खाईन.' तिथे पाणी नाही वेलींच्या जाळ्यांनी सूर्य झाकला जातो, रात्री झोपायला पानांचीच फक्त गादी असते' 'मी फुलं गोळा करेन', 'पायवाटांवरुन सळसळणारे साप सरपटत जातात आणि भक्ष्याची वाट पहात नद्यामध्ये पोहत असतात.' रंगीत पक्षांचे थवेच्या थवे उडतांना आणि गर्द झाडांत अदृश्य होतांना वाटसरुंना दिसतात. तिथे नेहमी जंगल असतं. काळोख आणि अतिशय भय असतं', राम म्हणाला, 'विंचू चावतात आणि रक्तांत विष सोडतात, हवे मध्ये ज्वर असतो. आगी अनियंत्रीत असतात. जवळपास कोणीही जिवलग मित्र नसतात. आणि अशाप्रकारे वन हे क्लेशकारक असतं.'

'तुमच्याविना अयोध्या मला वनासारखी भासेल.' सीता म्हणाली 'तुमचं धनुष्य शोभेसाठी नाही. तुमचा सुरा लाकड तोडण्यासाठी नाही, तुमचे बाण कांही खेळणी नाहीत, पण तुमच्या वादविवादापासून मला [illegible] ठेवा. आपण बरोबर राहू. पाणी अमृत असेल. ही वल्कलं रेशमी वस्त्रं होतील. जनावरांच्या कातड्यांचे [illegible] पांघरुणं होतील, मी कांही त्रास होणार नाही रामा, मी तुझ्यावर अवलंबून आहे. पेल्यात उरलेल्या पाण्यासारखं मला टाकून देतां येणार नाही. प्रिय रामा, तुझ्या चरणाची नम्र धूळ आहे मी. अगदी सावधानी, मला तूं कसं [illegible] टाळणार ?'

.....'तर मग ये,' स्मित हास्य करीत राम म्हणाले, 'तूं माझ्यावर प्रेम करतेस आणि मी तुझ्यावर, त्यांत आणखी ते काय आहे ? आपल्या बरोबर न्यायचे नाही ते आपल्याकडचे सर्व येळ न [illegible] दान करुन टाक आणि जाण्यासाठी तयार हो.'

घनदाट जंगल रामाला आवडलं, एकदा पहाटे रानटी गुलाब आणि गर्द झाडांच्या छायेखालून

सीतेबरोबर राम फिरायला गेले. जमीनीवर रान-फुलांचा गालिचा अंथरला होता. पावसाच्या पाण्यावरच जगणा-या चिमण्या गात होत्या झाडं आणि त्यांच्या फांद्या पृथ्वीमधलं अन्न शोषण केल्यामुळे सोन्यासारखी चमकत होती. रात्रीच्यावेळी तिच्या उशीचं काम करणारा रामाचा वल्कट वाहून हात देऊन राजहंसाच्या चाली सीता चालत होती त्यांनी अनुसरलेला मार्ग जसा वृक्षांनी आच्छादलेला होता त्याप्रमाणेच रामाच्या हृदयांत सदैव वसणा-या सीतेला रामाच्या प्रेमाने आच्छादिलेलं होतं.

...... तुम्हाला मी राधा व श्रीकृष्णाची एक फार छान गोष्ट सांगते आणि मग मी जाईन = एकदां असं झालं की श्रीकृष्णांशी विवाह केलेल्या स्त्रीयांना राधाजींविषयी फार असूया वाटली आणि त्यांनी श्रीकृष्णाला म्हटलं की तुम्ही आमच्यावर प्रेम करत नाही. त्यांतच नारद तिथे अवतरले व त्यांनी आगीवर तूप सोडले त्यांनी म्हणटलं 'मला वाटतं खरंच, ते तुमची कांही पर्वा करीत नाहीत, त्यांना फक्त राधा आवडते.'

त्यामुळे मुत्सद्दी अशा कृष्णाने म्हणायला सुरुवात केली 'अरे देवा, माझ्या पोटांत फार दुखायला लागलं आहे आतां मी काय करुं ? तर ते म्हणाले, आतां काय करायचं' श्रीकृष्ण म्हणाले, 'ते फार सोपं आहे. माझा भक्त असलेला कोणी तुम्हाला ठाऊक आहे कां ? त्याच्या पायाची धूळ जर तुम्ही मला खायला दिली तर मी ठीक होईन' तेव्हां त्यांना एकदम खूप भिती वाटली.

नाहीतरी, मी तुम्हाला जेव्हां कांही सांगते, त्यावेळी दर वेळी तुम्हाला तुमचं उत्तर द्यायचं असतं. माझं कोणी ऐकतच नाही. मी म्हटलं, इथे जा, तर नको नको त्या रस्त्याने जाणं बरं आहे. इथे या 'नको नको हा रस्ता चांगला आहे.' प्रत्येकाला त्या विषयी कांही सूचत असतं. हरकत नाही तर तिकडे त्यांना तसं सुचू लागलं. ते म्हणाले, 'तुम्ही कांहीतरी औषध कां नाही घेत ?' मग, कोणीतरी म्हणालं, आम्ही वैद्याला बोलावतो. ते म्हणाले, 'नको, मला नक्की माहीत आहे की, इतर कशाने मी बरा होणार नाही पण फक्त एक गोष्ट आहे, माझ्या एका भक्ताच्या पायाची धूळ तुम्ही आणा.ती मी खाईन.'

तर, सारे एकमेकांकडे पाहू लागले. जेव्हां पैसे देण्याची वेळ येते, त्यावेळी, सगळे सहजयोगी इतरांकडे पहातात, तसे, त्यांनी ते कधी ऐकलेलं नसतं, कांही जणांनी कधीच नाही, ते बरं. असं पहा, फार विचित्र स्वभाव असतो, तर, ते म्हणू लागले, आतां काय करायचं ? आपण जर श्रीकृष्णांना बरं केलं नाही, ते तर, नुसते दुखण्याने ओरडत आहेत. काय करायचं? श्रीकृष्ण म्हणाले, 'माझ्यावर थोडी दया करा. तुमच्या पायाची थोडी धूळ मला द्या.' मग त्यांनी नारदाला सांगीतलं, जा आणि राधेला तिच्या पायांची थोडी धूळ द्यायला सांग. तेव्हां ते राधेकडे गेले. श्री राधाजी वृंदावनांत होत्या. आणि, तिकडची धूळ केसरासारखी, केसरी रंगाची असते, तेव्हां नारद

गेले आणि त्यांनी सांगितलं,'श्रीकृष्णांना बरं नाही. त्यांना पोटांत फार दुखतंय.'

राधेला भिती वाटली, ती म्हणाली, 'खरंच कां ? तसं आहे ? माझा त्याच्यावर विश्वास बसत नाही. मग ते काय म्हणतात, ते काय औषधोपचार करु शकतात.' 'ते म्हणतात, त्यांचे कोणीही अनुयायी, कोणी भक्त त्यांच्या पायाची थोडी धूळ पाठवतील तर ते ठीक होतील. औषध म्हणून त्यांना ती घ्यायची आहे.' त्या म्हणाल्या, 'ठीक आहे माझ्या पायाची धूळ न्या.' त्यांना आश्चर्य वाटलं, 'हे तुम्ही काय करताय. तुम्ही जर त्यांना तुमच्या पायाची धूळ दिली तर तुमची सर्व पुण्यं नष्ट होतील. ते कांहीतरी खेळी करत आहेत. अशा गोष्टींच्या फंदात पडूं नका. तुमच्या पुण्याचं आणि पापाचं काय ?' त्या म्हणाल्या, 'एक गोष्ट जाणून घ्या, माझ्या पापपुण्याची काळजी ते वहातात. त्याविषयी मला विचार करायला नको.' केशरासारखी, केसरी रंगाची किंवा फुलांच्या परागासारखी, अशी त्यांची पायधूळ त्यांनी घेतली आणि ती श्रीकृष्णांना नेऊन दिली. श्रीकृष्णांनी म्हटलं, 'राधा पाठवेल, हे मला माहीत होतं. आतां मला ती खाऊ दे.' ते म्हणाले 'तुम्ही खा, पण एका प्रश्नाचं उत्तर आम्हाला सांगा. तुम्ही त्यांच्या पापपुण्यांकडे लक्ष देतां, असं श्री राधाजींनी म्हटलं ते कसं काय ? असं कसं होऊ शकतं ? त्याचा अर्थ काय ? पुण्य काय, पाप काय, ते तुम्हाला माहीत. त्यांना त्याची पर्वा नाही. त्यांना त्याची चिंता करायची नाही.' ते म्हणाले, 'ठीक आहे आधी मी औषध घेतो, त्यांनी औषध घेतलं आणि,'आपण झोपलेलं बरं,'असं म्हणून ते झोपले. आणि श्री नारदांनी पाहिलं तर, श्रीकृष्णांचं ह्दय उघडलं आणि त्यांत सुंदर गुलाबी रंगाचं कमळ होतं. त्या कमळावर श्री राधाजी झोपल्या होत्या. आणि त्यांचे चरण त्या कमळाच्या परागाला घासत होते आणि वृंदावनाच्या मातीचा पिवळा रंग हा तसाच होता. आणि त्यानंतर, त्यांच्या लक्षांत आलं की, जेव्हां, त्याला त्यांचा पदस्पर्श होत होता तर, त्यांनी कृष्णाला आपली पायधूळ दिली तर, काय झालं ? त्या तर त्यांच्या ह्दयांतच आहेत. त्यांचे चरणच कृष्णाच्या ह्दयांत आहेत. मग काय हरकत आहे ? आणि श्री राधाजींचं प्रेम इतकं महान होतं कीं, धर्म, अधर्माचा त्यांनी विचारच केला नाही, फक्त, त्यांच्या स्वामींच्या आज्ञेचं पालन करण्यासाठी त्यांनी ते केलं, आणि तशा प्रकारे श्रीकृष्णांच्या ह्दयामध्ये स्थान मिळवलं हे मग त्यांच्या लक्षांत आलं.

ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो.

## विवाहप्रसंगीच्या शपथा

वधू म्हणते - तुमचं मुलाधार चक्र व्यवस्थित ठेवण्यासांठी मी तुम्हाला मदत करेन. तुमच्याकडे असलेली सर्व संपत्ती तुम्ही माझ्याकडे सुपूर्द करावी तीची मी नीट काळजी घेईन. तुम्ही, फक्त मी किंवा तुमच्या भावाबहिणींनी शिजविलेलं अन्न ग्रहण करावं आणि जर घराबाहेर कांही खाल्लं तर, तुम्ही त्याला चैतन्यलहरी देऊन ते तुम्ही खावं मी तुमच्याशी एकनिष्ठ राहीन, तुम्ही माझ्याशी एकनिष्ठ रहावं.

वधू म्हणते - माझ्या शारिरीक व अध्यात्मिक शक्तिंनी मी सर्व गृहकृत्ये पार पाडीन. मी आपुलकीने, प्रेमाने राहील आणि तुमचं सारं आज्ञापालन करेन. माझ्या कामांत तुम्ही मला मदत करावी. आणि, सहजयोगाच्या तुमच्या कामांत मी तुम्हाला मदत करेन.

वधू म्हणते - माझं लक्ष्मीचक्र मी व्यवस्थित ठेवीन आणि माझ्या लक्ष्मीतत्त्वाला तुम्ही आदर राखावा. त्यामुळे तुमचं लक्ष्मीतत्व व्यवस्थित राहील. जे कांही तुम्ही घरी आणाल, त्या सा-याचा हिशोब तुम्ही घ्यावा, कांहीही लपवू नये.

वर म्हणतो - प्रेम आणि आपुलकीने मी तुला आनंद आणि शांती देईन. पण माझा आनंद आणि शांति यांच्याविषयी सुध्दां तुला विचार करावा लागेल. माझ्या अनुमतीशिवाय तुं बाहेर जाऊ नयेस आणि मी जेव्हां बाहेर जाईन, तेव्हां तुला सांगून जाईन. भूतकाळाचा विचार मी करणार नाही किंवा त्याविषयी चर्चा करणार नाही. तुं सुध्दां भूतकाळाचा विचार किंवा चर्चा करुं नयेस.

वर म्हणतो - माझी आणि माझ्या मुलांची तूं काळजी घेतली पाहिजेस. आपल्या घरी येतील त्या इतर सहजयोगी भाऊबहिणींचं, तुं, ते, घरी आल्यावर, स्वागत करावं.

वर म्हणतो - सहजयोगाचं आचरण करतांना माझ्याकडून कांही चूक झाली तर तुं मला क्षमा करावी आणि मी तुला क्षमा करेन.

दोघही म्हणतात - आमच्या विवाहाच्या योगे श्री माताजी निर्मलादेवी यांनी आम्हाला पवित्र बंधनाने जोडलं आहे. आणि श्री माताजींची ही कृती महायज्ञाप्रमाणे फार महान भाग्याची आहे.

आमचं सर्व कांही आमचे आरोग्य, संपत्ती, मन, ह्दय सर्वच त्यांच्या चरणकमलांवर आम्ही अर्पण करतो.

आम्ही एकमेकांशी एकनिष्ठ राहू अशी आम्ही शपथ घेतो.
सहजयोग वाढविण्यासाठी आम्ही काम करु.
आमची संतति आम्ही सहजयोगांतच वाढवू आणि ते आमचं कर्तव्य आहे.

- जय श्री माताजी -

राहूरी 1987

.... अतिशय आनंदांत रहाण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला अनेक लोक भेटले आहेत. तुमचा विवाह झाला आहे. तुम्ही इतके विवाह पाहीले आहेत. आपण किती आनंदात वेळ घालवला आहे, आणि त्यांचा प्रत्येक भाग आनंददायी चैतन्यलहरींनी भरलेला होता.

अर्थात तुमच्यापैकी कांही जणांना थोडसं वाईट वाटत असेल. मला ते कळत आहे. कारण तुमचे सहचर जायला निघाले आहेत. तुमच्यापैकी कांही जणांचे पती निघाले आहेत, कांहींच्या पत्नी जाण्यासाठी निघाल्या आहेत. त्यामुळे, कांही जणं बरीच हिरमुसली आलेली मला दिसत आहेत. पण ती देखील अशी गोष्ट आहे, एकमेकांविषयींचं आकर्षण, प्रेम, एकमेकांच्या सहवासाचा आनंद यामधून निघालेली. आणि मला त्यांत कांहीतरी फार छान सूचना दिसते आहे.

पण तरीसुध्दा मी म्हणेन, नाहीतरी, शेवटी तुम्ही एकमेकांना भेटणार आहांत. एकमेकांशी बोललेल्या चांगल्या गोष्टी आठवणार आहांत. आनंदांत रहाण्याचा प्रयत्न करा कारण, हे दिवस लवकरच उडून जातील, सहजयोगामध्ये तुम्ही काळ विसरता; सर्वकांही इतक्या पटकन वेळ जातो; या सर्व गोष्टी मागे पडतील, आणि परत एकदां तुम्ही तुमच्या पती किंवा पत्नी ज्याच्या त्याच्या बरोबर एकत्र याल.

या गोष्टीविषयी इतकं वाईट वाटून घेण्याचं कारण नाही. आणि हंसत खेळत रहा. त्यामुळे त्यांना असं वाटता नये 'आपल्या प्रेमिकेचा चेहरा रडवा झाला आहे' पण खात्री देणारा, धैर्य देणारा, चेहरा आठवा आणि आपण लवकरच भेटणार आहोत ही आशा ठेवा.

तुम्हाला सूर्यासारखं दिलं पाहिजे ... तुमच्याबरोबर तुम्ही सूर्य बाळगता. प्रेम आणि उब तुम्हाला पसरवली पाहिजे. भारतामधून तुम्ही सूर्य आणला आहे, असं त्यांना वाटू दे. तुम्ही योगी आहांत, सर्वसामान्य लोक नाही. तुम्ही योगी आहांत, प्रेम, करुणा, नितिमत्ता यामुळे प्रसिध्द असलेल्या लोकांच्या त्या वर्गाचं तुम्ही प्रतिनिधीत्व करता. त्यामुळे तुम्हाला सर्वांच्या प्रेम मिळावं अशी मी इच्छा करते. तुमच्या प्रवासाचा आनंद घ्या. सगळा काही आनंद लुटा. आणि तुम्ही इथे अनुभवलेला तो आनंद इतरांना द्या. सहजयोग्यांना द्या. आणि इतर लोक जे सहजयोगांतही नाहीत त्यांना देखील द्या.

ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो.